# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ / कार्तिक २९, १९४० ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७४**

---

### दादर (मुंबई) येथील छप्रा व मोहसीन इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(१) * १२७९६१ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील छप्रा इमारतीतील रहिवाशांची विकासकांकडून फसवणूक झाल्यामुळे येथील रहिवाशी बेघर होऊन विस्थापित झाले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास नियंत्रण नियमावली ३३/७ नुसार पुनर्विकास योजनेत म्हाडा पालकत्व असलेल्या या इमारतीचा प्रकल्प ताब्यात घेण्यासाठी नोव्हेंबर, २०१६ मध्ये म्हाडा प्राधिकरणाने शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छप्रा व मोहसीन इमारतीचा पुनर्विकास श्री.उदय सुर्वे या विकासकामार्फत करण्यात येत असून विकासकाने १० वर्षांपासून लाभार्थ्यांना घरे व भाडेही दिले नाही ते त्यांना तातडीने देण्यात यावे व पुनर्वसन प्रकल्पाची सखोल चौकशी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार सदरील रहिवाशी कुटुंबांना त्यांची हक्काची घरे मिळवून देण्याबाबत तसेच संबंधित विकासकाविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) मुख्य अधिकारी, इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी त्यांच्या दि.२७.११.२०१५ रोजीच्या पत्रान्वये विकासकास चेतावणी / सुचना देण्यात आली होती. तद्नंतर सुध्दा विकासकाने काम सुरु न केल्यामुळे, विकासकास दि.०७.०४.२०१६ रोजीच्या पत्रानुसार कारणे दाखवा नोटीस व दि.२०.०८.२०१८ रोजीच्या पत्रानुसार अंतिम कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे.

याबाबत भाडेकरु /रहिवाशी व विकासक यांची दि.२३.०५.२०१६ रोजी मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी मा. लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठक घेतली असून सदर बैठकीमध्ये विकासकाचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, निधी अभावी त्यांचे काम बंद आहे व लवकरच उपाययोजना करुन काम सुरु करण्यात येईल.

मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक असलेल्या उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने होण्यासाठी ०८ आमदारांची समिती गठित केली आहे. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने जे प्रकल्प अर्धवट अवस्थेत बंद पडलेले आहेत, असे प्रकल्प संपादित करून म्हाडाच्या माध्यमातून उर्वरित काम पूर्ण करण्याबाबतची तरतूद म्हाडा अधिनियम १९७६ मध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली (जि.मुंबई उपनगर) हनुमाननगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(२) * १२६९८७ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजना मौजे-आकुर्ली (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) नभूक्र.१६३ (पै) या मिळकतीवरील कांदिवली हनुमाननगर श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत (एसआरए) (रजि नं.बी.ओ.एम. (डब्लु) आर.एच.एस.जी. (टी.ओ.) ७६३७/९४-९५), वीर तानाजी नगर वडारपाडा, रोड नं.२, आकुर्ली, कांदिवली पुर्व, मुंबई-१०१ या पुनर्वसन योजनेतील इमारतींचे काम विकासक विजया डेव्हलपर्स यांनी २० वर्षे झाले तरी पूर्ण केले नसल्याबाबतच्या तक्रारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व सक्षम मुख्य अधिकारी यांच्याकडे सोसायटीच्या मुख्य प्रवर्तक व रहिवाशांनी वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मुख्यप्रवर्तक व रहिवाश्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी विकासक विजया डेव्हलपर्स याच्यांविरुध्द कारवाई करण्याऐवजी श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मुख्यप्रवर्तक व अध्यक्षांना दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी नोटीस पाठविली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नोटीसीला मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना गृहनिर्माण सोसायटीच्या मुख्यप्रवर्तक व अध्यक्षांनी सविस्तर उत्तर देऊन २ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला तरी विकासक विजया डेव्हलपर्स यांच्याविरुध्द कारवाई न करण्याची कारणे काय आहेत, व उक्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गतच्या इमारतीचे काम पुर्ण होण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मुख्यप्रवर्तक यांनी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींना दिलेल्या तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजी विकासकाविरुध्द कारवाई करावी असे पत्रही मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना दिले आहे, हे ही खरे आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रलंबित योजनांच्या आढावा घेत असताना श्री गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेची योजना दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्याने सदरहू योजनेतील विकासक मे. विजया डेव्हलपर्स, वास्तुविशारद एस.जी.नेमिवंत व श्री गणेश कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक, अध्यक्ष, सचिव यांना महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ चे कलम १३ (२) अन्वये दि. ५ डिसेंबर, २०१६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(३) सदर नोटीसला अनुसरुन गृहनिर्माण संस्थेने दि.१६/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खुलासा सादर केला. परंतु विकासकाकडून खुलासा प्राप्त न झाल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ चे कलम १३ (२) अंतर्गत पुढील कार्यवाही करणेबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास निदेश देण्यात आले आहेत.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

अशा आशयाची गृहनिर्माण संस्थेची निवेदने प्राधिकरणास प्राप्त झाली असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्यावतीने एलईडी दिवे बसविण्याचे काम विनानिविदा दिल्याबाबत

**(३) * १३२४१२ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्यावतीने वीज बचतीसाठी शहरातील सर्व रस्त्यांवरील पथदिव्यांना एलईडी दिवे बसविण्याचा प्रकल्प महानगरपालिकेने हाती घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणतीही निविदा न काढत एलईडी दिवे बसविण्याचे काम परस्पर टाटा प्रोजेक्ट या कंपनीस देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया, ठेकेदार कंपन्यांना देण्यात आलेले कार्यादेश, खाजगी बँकेत निधी जमा करणे या सर्वांची चौकशी मुख्य लेखापरीक्षकामार्फत करण्याचे आदेश आयुक्त, महानगरपालिका यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अहवालावरून सदर प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार व प्रशासकीय अनियमितता आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या कंपनीला उर्वरित कामास प्रतिबंध करण्याबाबत व वीज बचतीप्रमाणे विजेचा मोबदला कंपनीला दिला आहे तो वसूल करण्याकरिता आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) असल्यास, सदर टाटा प्रोजेक्ट या कंपनीला नियमित निविदा न काढता थेट काम देणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) • एलईडी दिवे बसविण्याच्या प्रकल्पासाठी महापालिकेने सन २०१६ मध्ये निविदा प्रसिध्द करून दि.०९.०९.२०१६ रोजी मे.टाटा प्रोजेक्ट लि. यांना कार्यादेश देण्यात आले आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) • मुख्यलेखापरिक्षक, पुणे महानगरपालिका यांचेमार्फत संपूर्ण कामाचे लेखापरिक्षण करण्यात आले असून त्याचा अहवाल दि.२१.०८.२०१८ रोजी आयुक्तांना प्राप्त झाला आहे.

• सदर अहवालामध्ये एलईडी प्रकल्पाच्या निविदा प्रक्रीयेच्या कार्यपध्दतीबाबत तसेच अन्य बाबींवर आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

(५) • याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

• कंपनीकडून निविदेप्रमाणे आवश्यक एलईडीची खरेदी करण्यात आली असून त्यानुसार त्यांना मोबदला देण्यात येत आहे.

• त्यामुळे कंपनीकडून मोबदल्याची वसूली करण्याची तसेच कंपनीला उर्वरित कामात प्रतिबंध करण्याची आवश्यकता नसल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(६) • या प्रकरणी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेमार्फत थर्ड पार्टी ऑडीट करण्यात येत असून तपासणी अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

• पुणे महानगरपालिकेच्या एलईडी प्रकल्पाच्या संपूर्ण प्रक्रीयेची सखोल चौकशी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात येत आहे.

• तसेच मुख्यलेखापरिक्षक, पुणे महानगरपालिका यांनी घेतलेल्या आक्षेपाबाबतचा अहवाल विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना चौकशीकरीता उपलब्ध करून देण्याबाबत पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली येथील चौगुले मॅटर्नीटी रुग्णालयामध्ये बेकायदा गर्भपात केल्याप्रकरणी डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(४) * १२७७४७ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील गणेशनगरमधील चौगुले मॅटर्निटी व सर्जिकल रुग्णालयामध्ये महिलांचा बेकायदा गर्भपात करून भ्रूणांची हत्या केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी टाकलेल्या धाडीत २५ महिलांचा गर्भपात केल्याचे निदर्शनास आले असुन डॉ. रुपाली आणि डॉ. विजयकुमार चौगुले यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयावर सांगली महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिका-यांच्या पथकाने कारवाई करुन कालबाहय औषधे व गर्भपातासाठी वापरण्यात येणारे १५ किट ताब्यात घेतल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करून सदर प्रकरणातील संबंधीत सर्व दोषींवर अद्यापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

महानगरपालिकेचे वैद्यकिय आरोग्य पथकाने केलेल्या कारवाईमध्ये औषधे, गोळयांचे रिकामे स्ट्रीप्स व बॉक्स तसेच गर्भपातासाठी वापरण्यात येणारे कीट आढळून आले ते पोलीसांकडे जमा केले आहे.

(४) सांगली शहर पोलीस ठाणे येथे सर्व संबंधित डॉक्टरांच्या विरुध्द वैद्यकिय गर्भपात अधिनियम १९७१ व २००२ च्या कलम ४ (ब) आणि कलम ५ (३) (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून शासन सेवेतील वैद्यकिय अधिकाऱ्याविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकरण पोलीस यंत्रणेकडे तपासाधीन असून संबंधित डॉक्टरांना न्यायालयीन कोठडीचे आदेश कोर्टाने दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई तसेच रायगड येथील औद्योगिक वसाहतींमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(५) * १२७०३० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल),**

**श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहूल, शिवडी आणि वडाळा येथील रिफायनरी, तेलकंपन्या तसेच रासायनिक कंपन्यामुळे हा विभाग धोकादायक झाला आहे तसेच रायगडमधील रसायनी औद्योगिक पट्टा हा रासायनिक कारखान्यांमुळे अतिशय स्फोटक झाला असून या ठिकाणी अनेक अपघात घडत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील महाड एमआयडीसी औद्योगिक वसाहतीमध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सिक्वेंट सायंटिफिक लि. या केमिकल कंपनीमध्ये रासायनिक स्फोट होवून ४ कामगार गंभीर जखमी झाले असून महाड एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीमध्ये सन २०१५ पासून ते अद्यापपर्यंत झालेल्या स्फोटाच्या व आग लागण्याच्या घटनांमुळे सुमारे ५० कामगारांना जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले असून सदर औद्योगिक क्षेत्रामध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्यामुळे तेथील सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, खोपोली (जि.रायगड) औद्योगिक क्षेत्रातील मे.प्रिमियर कंपनी या तेलाच्या कंपनीला दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औद्योगिक विभागातील कामगारांची सुरक्षा, त्यांचे आरोग्य आणि कारखान्यांची सुरक्षा याकडे राज्याच्या औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा व आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच स्फोटातील कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

तथापि, मुंबईतील माहूल येथील एका कारखान्यात हायड्रोकार्बन प्लांटमध्ये दिनांक ०८/०८/२०१८ रोजी इफ्ल्युंट कुलरमधील दाबयुक्त अतिज्वालाग्रही वायुची गळती झाल्याने सदर वायु वातावरणात मिसळला व त्याचा स्फोट होऊन आग लागली. परंतु, सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान रायगड जिल्हयातील रसायनी औद्योगिक पट्टयात कोणत्याही स्फोटाची घटना घडलेली नाही.

(२) दिनांक २/९/२०१८ रोजी सिक्वेंट सांयटीफिक लि., एमआयडीसी, महाड या कारखान्यात रासायनिक स्फोट झालेला नसून सेंट्रीफ्युज विभागातील पाईपलाईन बदलण्याचे काम चालू असताना आग लागण्याची घटना घडली आहे. ही आग लगेच आपोआप विझली. सदर घटनेत चार कामगारास किरकोळ भाजण्याच्या जखमा झाल्या. सर्व कामगार उपचारानंतर कामावर हजर झाले आहेत. सर्व कामगारांना कोणत्याही स्वरुपाचे अपंगत्व आलेले नाही.

सन २०१५ पासून महाड औद्योगिक क्षेत्रात स्फोट व आगीच्या घटनांमध्ये एकाही कामगाराचा मृत्यू झालेला नाही.

सन जानेवारी २०१५ ते ऑक्टोंबर-२०१८ पर्यंत आगीच्या ०५ व स्फोटाची ०१ घटना घडलेली आहे.

(३) दि. ०८/४/२०१८ रोजी खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ढेकू, औद्योगिक वसाहतीतील प्रिमियर पेट्रोकेम या आस्थापनेला आग लागली होती, हे खरे आहे

(४) औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा व आरोग्य धोक्यात येवू नये म्हणून औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाव्दारे केंद्रिय निरिक्षण प्रणाली मार्फत नोंदणीकृत रासायनिक कारखान्यांचे प्राधान्याने निरिक्षण केले जाते. निरिक्षणावेळी आढळलेल्या भंगाबाबत कायदेशीर कारवाई केली जाते व त्रृटींची पुर्तता करण्याच्या सूचना दिल्या जातात. अतिधोकादायक कारखान्यामध्ये नियमितपणे रंगीत तालिम ( Mock Drill) घेऊन दुर्घटना हाताळण्याचे सराव केले जातात. अशा घटना टाळण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा लेखा परिक्षण नियम-२०१४ नुसार, रासायनिक व अतिधोकादायक कारखान्यांचे शासन मान्यता प्राप्त सुरक्षा लेखा परिक्षकाकडून (Safety Auditor) सुरक्षा लेखा परिक्षण करुन घेण्यात येते.

(५) होय, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

अ) सिक्वेंट सायंटीफीक लिमिटेड, महाड -

या कारखान्यातील आग सौम्य स्वरुपाची होती. ही आग कोणतीही अग्निशमन यंत्रणा न वापरता लगेच विझली. ही आग एमएस प्लेटवर चिकटलेले रसायनाचे अवशिष्ट साफ न करता Gas Cutting करताना आग लागली, यामुळे भोगवटादाराविरुद्ध कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ A (२) (a) चा भंग आढळला आहे व त्याबाबत कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

सर्व कामगारांच्या दवाखान्याचा व औषधोपचाराचा एकुण खर्च रु. १,३०,५००/- इतका व्यवस्थापनाने केला आहे व जखमी कामगारांना कोणतेही अपंगत्व आलेले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई व सानुग्रह अनुदान देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

आ) प्रिमियर पेट्रोकेम, खालापूर -

या आस्थापनेत वापरलेले, काळे झालेले वंगण तेल (Lubricating Oil) स्वच्छ करुन डांबर मिश्रण तयार केले जाते. या आस्थापनेत २० पेक्षा कमी कामगार असल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ च्या तरतुदी लागू होत नाहीत. पोलिसांनी सदर प्रकरणी अकस्मात अग्नी रजिस्टर नं.०५/२०१८, दिनांक-१०/०४/२०१८ अशी नोंद घेतलेली आहे.

इ) मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड,चेंबूर, मुंबई- सदर कारखान्यातील इफ्ल्युंट कुलरमधून दाबयुक्त अतिज्वालाग्रही वायुची गळती झाल्याने सदर मिश्रणाचा स्फोट होऊन आग लागली .

सदर जखमी कामगारांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च कारखाने व्यवस्थापनाने केलेला आहे. त्यांना कोणतेही अपंगत्व आलेले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## शासकीय पदभरतीकरिता महापरिक्षा पोर्टलद्वारे परिक्षा घेण्याचा शासनाचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीबाबत

**(६) * १२७८९१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय सेवेतील रिक्त पदावर शिफारस करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान (आयटी) विभागाने ऑनलाईन परिक्षा घेण्यासाठी 'महापरिक्षा' पोर्टल सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापरिक्षा पोर्टलव्दारे होणाऱ्या परिक्षा सलग दोन किंवा तीन दिवस शिफ्टमध्ये चालत असल्याने, पहिल्या शिफ्टच्या प्रश्न पत्रिकेतील प्रश्न, त्यांची मांडणी, प्रश्न विचारण्याची पध्दत, अभ्यासक्रमातील ठराविक भागावर विचारण्यात आलेले प्रश्न, हे पेपर झाल्यानंतर काही तासातच सोशल मिडीयावर व्हायरल होतात, तसेच या पोर्टलचे कंत्राट मध्य प्रदेशातील व्यवसायिक परिक्षा मंडळाच्या (व्यापमं) परिक्षा घेणाऱ्या यूएसटी ग्लोबल या आयटी कंपनीला देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर युएसटी ग्लोबल कंपनीवर इतर विभागांकडील परीक्षा घेताना झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी कारवाई करण्यात आली होती, ही बाब दुर्लक्षित करुन या कंपनीस हे काम देण्यात आले असल्यामुळे राज्यात महा ई परीक्षा पोर्टलसाठी सेवा पुरवठादार नेमताना गैरव्यवहार झाल्याची तक्रार मा. लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी सरकारी नोकर भरती सदोष पोर्टलच्या आधारे, मध्यप्रदेश प्रमाणे महाराष्ट्रात आगामी ७२ हजार पदांच्या भरतीमध्ये घोटाळा होण्याच्या भितीने, कर्मचाऱ्यांची भरती महापरिक्षा पोर्टलव्दारे करण्यात येऊ नये याकरिता भारतीय विद्यार्थी मोर्चा आंदोलकांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास नाशिक येथे आंदोलन केले तसेच दिनांक ५

ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्पर्धा परिक्षा विद्यार्थी कृती समितीने जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या कार्यालयावर मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी महा व्यापम घोटाळा होण्याची शक्यता लक्षात घेता महापरिक्षा पोर्टलद्वारे घेण्यात येणाऱ्या परिक्षांमध्ये गैरप्रकार होत असल्याचे परिक्षार्थींच्या तक्रारी आहेत, महापरिक्षा पोर्टलद्वारे शासकीय पदभरती करिता परिक्षा घेण्याचा शासनाने घेतलेला निर्णय रद्द करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे २९ ऑगस्ट, २०१८ रोजी केली आहे, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, महापरिक्षा पोर्टलद्वारे घेण्यात आलेल्या परिक्षेत गैरप्रकार झाल्याबाबतच्या तक्रारीसह या संपुर्ण प्रकरणाची  चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार महापोर्टलकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा रद्द करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) महापरीक्षा पोर्टल विकसीत करण्याकरीता विहीत पद्धतीने दिनांक २ मे २०१७ रोजी निविदा काढण्यात येवून तांत्रिक आणि आर्थिक मुल्यमापनानंतर युएसटी ग्लोबल या संस्थेची निवड करण्यात आली आहे. यासंदर्भात मा.लोकप्रतिनिधींकडून तक्रार प्राप्त झाली आहे.

(४) होय, महापरिक्षा पोर्टल रद्द करण्याबाबत भारतीय विदयार्थी मोर्चा यांच्या वतीने दिनांक. २१ सप्टेंबर, २०१८ रोजी व दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी शिक्षण वाचवा नागरी कृती समिती व कोल्हापूर जिल्हयामधील स्पर्धा परिक्षा विदयार्थी यांचेवतीने निवेदने देण्यात आली आहेत.

(५)  महापरिक्षा पोर्टलव्दारे घेण्यात येणाऱ्या परिक्षांबाबत परिक्षार्थींच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच यासंदर्भात मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांचे पत्र प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषगांने तपासणी व योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) सदर पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषगांने महापरिक्षा पध्दतीचे विश्लेक्षण करून प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाहीचा तपशिलवार अहवाल तयार करण्यात येत आहे. तसेच महापरीक्षा पोर्टलचे तांत्रिक परीक्षण त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात येत आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यामधील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील कृषी विद्यापीठाच्या बसला आंबेनळी घाटात झालेला अपघात

**(७) * १२६४९९ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक**

**चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावर आंबेनळी घाट (जि.सातारा) येथे दिनांक २८ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास दापोली (जि.रत्नागिरी) येथील डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना महाबळेश्वर येथे सहलीला घेऊन जाणारी बस ६०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३३ कर्मचारी व चालक ठार झाले व केवळ एक अधिकारी बचावला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन विभागाने चौकशी करून चौकशीचा अहवाल दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील घटनेनंतर राज्यातील घाट येथील अरुंद आणि निमुळत्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीचा प्रश्न प्रकर्षाने समोर आला असून सदरहू अपघात स्थळ परिसरात लोखंडी खांब व पट्ट्या उभारण्यासाठी तरतूद झालेली असतानाही ठेकेदाराच्या बेजबाबदार व निष्काळजीपणामुळे लोखंडी खांब व पट्ट्या लावण्यात आलेल्या नव्हत्या, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंबेनळी अपघातात नाहक मृत्यूमुखी पडलेल्या मृतांच्या नातेवाईकांनी, अपघातामध्ये बचावलेल्या श्री. प्रकाश सावंत देसाई यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करत दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास सर्वपक्षीय मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अपघाताची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर घटनेस जबाबदार असणाऱ्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच सदर अपघातात मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत व कुटुंबातील एका व्यक्तीला अनुकंपा तत्त्वावर सरकारी नोकरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर अपघातामध्ये बसमधील एकूण ३० प्रवासी मयत झाले असून एक प्रवासी बचावला आहे.
(२) या घटनेचा प्राथमिक अहवाल परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी शासनास (परिवहन विभागास) दिनांक ६.९.२०१८ रोजी सादर केला आहे.
(३) हे खरे नाही.

प्रश्नामधील अपघाताच्या ठिकाणी रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागाची रुंदी ५.५० मीटर आणि दोन्ही बाजूच्या साईडपटटीसह रस्त्याची रुंदी १०.५० मीटर इतकी आहे.

या विभागातील इतर घाटांमधील रस्त्यांची डांबरी पृष्ठभागाची रुंदी ५.५० मीटर व दोन्ही बाजूच्या साईडपटटीसह रस्त्याची रुंदी सुमारे ८.०० मीटर ते १२.०० मीटर दरम्यान आहे. अपघात घडलेल्या ठिकाणी ३०० मीटरचा रस्ता सरळ आहे. अपघाताच्या पुढे व मागे वळणांवर क्रॅश बॅरिअर्स, सूचनाफलक लावण्यांत आलेले आहेत.
(४) दिनांक २९.०८.२०१८ रोजी रत्नागिरी जिल्हयातील लोकप्रतिनिधी, दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांचे नातेवाईक व सुमारे १५० ते २०० गांवकरी यांनी दुर्घटनेतून बचावलेले श्री.प्रकाश सावंत देसाई यांचेवर कोंकण कृषी विद्यापीठाकडून कारवाई का करण्यांत आली नाही याचा जाब

विचारण्याकरीता व त्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवावे या मागणीकरीता निबंधक, कोंकण कृषी विद्यापीठ यांना निवेदन दिलेले आहे.
(५) याप्रकरणी अपघात रजि. क्र. ५२/२०१८ प्रमाणे पोलादपूर पोलीस ठाणे (जि.रायगड) येथे दाखल असून पुढील कार्यवाही पोलादपूर पोलीस ठाणे यांचेमार्फत चालू आहे.

त्याचप्रमाणे, महसुल व वन विभाग (मदत व पुर्नवसन) यांचे दिनांक ७.९.२०१८ रोजीच्या आदेशान्वये विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे. सदर अपघाताच्या घटनेची चौकशी समितीकडुन सुरु आहे.
(६) अपघातग्रस्त दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना पंतप्रधान सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु. दोन लाख (एकूण रु. ६० लाख) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी रु. ४ लाख (एकूण रु. १.२० कोटी) असे एकूण प्रत्येकी रु. ६ लाख अदा करण्यांत आलेले आहेत.

याव्यतिरिक्त अपघातग्रस्त दिवंगत कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांना खास बाब म्हणून गट "क" व गट "ड" मधील रिक्त पदांवर अनुकंपा कारणास्तव नेमणूक मिळणेबाबतचा प्रस्ताव कोंकण कृषी विद्यापीठाकडून शासनाच्या कृषी विभागास प्राप्त झालेला आहे. त्याअनुसरुन पुढील कार्यवाही चालू आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहर पोलिस स्टेशन बुलढाणा येथे तक्रार नोंदविण्यास गेलेल्या नागरिकांना मारहाण केल्याबाबत

**(८) * १२८१९३ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहर पोलिस स्टेशन बुलढाणा येथे अपघातात मृत्यू झालेल्या बालकाच्या मृत्यूस जबाबदार व्यक्तींविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांकडून हॉटेल व्यवसायिक व कामगार यांना मारहाण झाल्याची तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या नागरिकांना ठाणेदार, पोलीस उपनिरीक्षक व

कर्मचारी यांनी अमानुष मारहाण केल्याची बाब दिनांक १४ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हॉटेल व्यावसायिक, कामगार यांना ठाणेदार पोलीस उपनिरीक्षक व कर्मचाऱ्यांनी अमानुष मारहाण केल्याची तक्रार देखील दिनांक १४ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास शहर पोलिस स्टेशन बुलढाणा येथे दाखल असून तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणतीही कारवाई झालेली नसल्याची बाब दिनांक १ ऑगस्ट २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी गेलेल्या निरपराध नागरिकांना अमानुष मारहाण करणाऱ्या ठाणेदार, पोलीस उपनिरीक्षक व कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) श्री. शेख सादीक शेख नदीम यांच्या मुलास दिनांक १४/०६/२०१८ रोजी रस्त्याच्या कडेला उभा असताना मोटरसायकलने धडक दिली. त्यामुळे जखमी मुलाला उपचारासाठी भवटे हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले असता, उपचारादरम्यान त्या मुलाचा मृत्यू झाला. त्यामुळे मृतकाच्या कुटूंबियांनी व अन्य १५० ते २०० लोकांनी डॉ.भवटे यांचे दवाखान्याबाहेर बेकायदेशीर जमाव जमवून कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण केली. त्यावेळी पोलीसांनी जमलेल्या लोकांना शांततेत आपआपल्या घरी जाण्यास सांगितले. यावेळी जमावावर लाठीचार्ज किंवा कोणास मारहाण केलेली नाही.

जिल्हा दंडाधिकारी, बुलढाणा यांचे जमावबंदी आदेश लागू होते. त्यामुळे या घटनेनंतर पोलीस उप निरीक्षक हे पेट्रोलिंगसाठी डॉ.भवटे यांच्या दवाखान्याकडे जात असताना संगम चौकात ८-१० लोक आपसात झोंबाझोंबी करीत आरडाओरड करुन सार्वजनिक शांतता भंग करीत होते. त्यावेळी त्यातील काही जणांना पोलीसांनी ताब्यात घेऊन त्यांचेविरुध्द कलम

११०/११७, म.पो.का. प्रमाणे किरकोळ स्वरुपाची कारवाई केली आहे.

वास्तविक पाहता या घटनेनुसार संबंधित इसमांविरुध्द कलम १६० भा.द.वि. नुसार गुन्हा नोंद करुन कारवाई करणे आवश्यक होते. परंतु नियमाप्रमाणे कारवाई न केल्याने याबाबत केलेल्या चौकशीत कर्तव्यात कसुरी केल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हेड कॉन्स्टेबल व पोलीस नाईक यांचेविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. ठाणेदार पोलीस निरीक्षक यांचेवर दोन वर्षे वेतनवाढ रोखणेबाबतचा कसुरी अहवाल पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना सादर करण्यात आला आहे. तसेच पोलीस उपनिरीक्षक यांची बदली औरंगाबाद परिक्षेत्र येथे झाल्याने त्यांना बुलढाणा जिल्ह्यातून कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांच्या कसूरी संदर्भात शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यासाठी संबंधित घटकप्रमुखांना अहवाल सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कसुरदार पोलीस हेड कॉन्स्टेबल व पोलीस नाईक यांना पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन वर्षे रोखण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने माहे नोव्हेंबर २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत केलेला गैरव्यवहार

**(९) * १२६९१७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने माहे नोव्हेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत बांधकाम कामगारांकरीता अत्यावश्यक संच पुरविणे, सुरक्षा संच पुरविणे, मध्यान्ह भोजन योजना निविदा आणि सर्व्हे ऑफ कन्स्ट्रक्शन वर्कर्स, मुंबई येथे अद्ययावत कार्यालय

व राज्यात ३५ ठिकाणी कार्यालय बांधकामासाठी कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती निविदा प्राप्त झाल्या आहेत त्यापैकी कोणकोणत्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सुरक्षा आणि अत्यावश्यक संच खरेदी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली असून या समितीला निविदा / खरेदीचे सर्वाधिकार असताना या समितीकडे निविदा मंजूरीसाठी न पाठविता इतर कंपन्यांना निविदा देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाद्वारे नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणे, अत्यावश्यक संच पुरविणे, एकात्मिक संगणकीय प्रणाली, सुविधा केंद्र स्थापन करणे व मध्यान्ह भोजन योजना (विभागनिहाय ०३ निविदा) अशा एकूण ०७ ई-निविदा दिनांक २८.११.२०१६ ते दिनांक २०.६.२०१८ या कालावधीत शासनाच्या ई-निविदा पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

(२)

| अ.क्र. | ई-निविदा | प्राप्त निविदा | स्वीकृत निविदा |
|---|---|---|---|
| १ | सुरक्षा संच | ०४ | मे.इंडो अलाईड फूडस प्रा.लि.यांची निविदा स्वीकृत करण्यात आली |
| २ | अत्यावश्यक संच | ०४ | मे.गुनिना कमर्शियल प्रा.लि.यांची निविदा स्विकृत करण्यात आली. |
| ३ | एकात्मिक संगणकीय प्रणाली | ०३ | अद्याप निविदा स्वीकृत केली नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | कामगार सुविधा केंद्र | ०४ | सर्व निविदा तांत्रिक छाननीत अपात्र. फेर निविदा मागविणे प्रस्तावित आहे. |
| ५ | मध्यान्ह भोजन योजना (३ निविदा) | ०४ (प्रत्येकी) | निविदांची तांत्रिक छाननी प्रगतीपथावर आहे. |

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गवंडी कामगार कल्याणकारी मंडळातील दलालांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे कामगार लाभापासून वंचित राहत असल्याबाबत

**(१०) * १३२३२८ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गवंडी कामगार कल्याणकारी मंडळातील दलालांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे खरे कामगार लाभापासून वंचित राहत असून दलालांना आवर घालण्याच्या मागणीचे निवेदन गवंडी बांधकाम कामगार मजदूर युनियनच्या सिंदी (रेल्वे), जि.वर्धा शाखेच्या पदाधिका-यांनी नागपूर येथे कामगार आयुक्तांची भेट घेऊन दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ठेवीदारांची आर्थिक फसवणुक केलेल्या खटल्यांचे जलदगतीने निकाल लावण्यासाठी अतिरिक्त न्यायालयांची निर्मिती करण्याबाबत

**(११) * १२७१४५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हजारो ठेवीदारांची आर्थिक फसवणुक करुन गुंतवणुक कंपन्यांनी सुमारे ५० हजार कोटी रुपयांचे आर्थिक गैरव्यवहार केले असल्यामुळे सदर खटल्यांचा जलदगतीने निपटारा करुन सर्वसामान्य गुंतवणुकदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी अतिरिक्त न्यायालयांची निर्मिती करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव, विधी व न्याय यांचेकडे माहे जुलै, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये वा त्या दरम्यान तसेच वारंवार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सर्वसामान्य गुंतवणुकदारांना न्याय मिळवून देण्यासाठी अतिरिक्त न्यायालयांची निर्मिती करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. राज्यातील हजारो ठेवीदारांची आर्थिक फ़सवणूकीबाबतचे दावे जलदगतीने सोडविण्यासाठी अतिरिक्त न्यायालयांची निर्मिती करण्याची मागणी मा.श्री.संजय केळकर, वि.स.स.यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे केली आहे.

(२) एखादे प्रकरण/खटला प्रकरणी अतिरिक्त न्यायालयाची निर्मिती करण्याचे अधिकार मा.उच्च न्यायालयास आहेत. तसेच, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २३५ नुसार दुय्यम न्यायालयांवर मा.उच्च न्यायालयाचे नियंत्रण असल्यामुळे मा.श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाच्या अभिप्रायार्थ पाठविण्यात आला आहे. अभिप्राय अप्राप्त आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई उपनगर) परिसरातील माहूल याठिकाणी असलेल्या एच.पी.सी.एल., बी.पी.सी.एल. रिफायनरी व रासायनिक कारखान्यामुळे परिसरातील वातावरण प्रदूषित होत असल्याबाबत

**(१२) * १२६४५१ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील चेंबूर परिसरातील माहूल या ठिकाणी असलेल्या एच.पी.सी.एल., बी.पी.सी.एल. रिफायनरी व रासायनिक कारखान्यामुळे त्या परिसरातील वातावरण प्रदूषित होऊन अनेक प्रकारची रोगराई निर्माण होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तसेच सेवा सुविधांचा अभाव असल्याने त्या परिसरात स्थायिक असलेल्या नागरिकांना येथून स्थलांतरित करून अन्य ठिकाणी त्यांचे पुर्नवसन करावे अशी मागणी घर बचाव घर बनाओ आंदोलन माहूल प्रकल्पग्रस्त समितीने मा.गृहनिर्माण मंत्री, स्थानिक आमदार यांच्याकडे लेखी निवेदनाद्‌वारे दिनांक ८ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालयानेही माहूल गाव परिसरातील रासायनिक प्रदुषणामुळे तेथील स्थानिकांचे अन्यत्र पुनर्वसन करावे व नव्याने अन्य प्रकल्पग्रस्ताचे माहूल गावात पुनर्वसन होऊ नये असा निर्णय नुकताच जनहित याचिकेवर दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भातील याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने प्रकल्पग्रस्तांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करावे अन्यथा त्यांना शहरातील इतर कुठल्याही भागात राहण्यास घरभाडे देण्यासाठी योग्य ती रक्कम पुरवावी असे दोन पर्यायापैकी एक पर्याय निवडून दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजीपर्यंत निर्णय घेण्यास सांगितले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, घर बचाव घर बनाओ आंदोलन माहूल प्रकल्पग्रस्त समितीने देलेल्या मागणी निवेदनाच्या व मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) “घर बचाव घर बनाओ आंदोलन” यांचे दिनांक ३०.१०.२०१८ रोजीचे निवेदन मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना सादर करण्यात आले हे खरे आहे.
(२) सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असून याबाबत मा. उच्च न्यायालयाने अद्याप असा निर्णय दिला नाही.
(३) व (४) तानसा पाईपलाईनच्या पात्र प्रकल्पग्रस्तांना तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ निवास देण्याच्या शक्यतेची पडताळणी करण्याबाबत तसेच माहूल येथील वसाहतींशी संबंधित प्रश्नांचे निराकरण होईपर्यंत, दरमहा वाजवी रक्कम देण्याच्या विकल्पाचा विचार करण्याचे आणि त्याबाबत दिनांक ०१.१०.२०१८ पर्यंत निर्णय घेण्याचे मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०८.०८.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये नमूद करण्यात आले आहे.

तद्नुषंगाने तात्पुरते तदर्थ संक्रमण निवास उपलब्ध नसल्याचे तसेच आर्थिक मोबदला देण्याचे प्रयोजन नसल्याचे मा. उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील तसेच एल.एस.रहेजा रुग्णालयातील समन्वयक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच स्वीकारतांना केलेली अटक

**(१३) * १२६८९६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयातील शासकिय समितीचा समन्वयक श्री. तुषार सावरकर आणि माहिम येथील एल.एस.रहेजा या खासगी रुग्णालयाचा समन्वयक श्री.सचिन साळवे यांना श्री.जमालुद्दीन खान यांच्यावरील मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी लाच स्वीकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी रुग्णालयातील ५२९ मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया प्रकरणांच्या आवकजावक नोंदीच जे.जे.रूग्णालयाचे समाजसेवा अधिक्षक श्री.तुषार सावरकर यांनी ठेवली नसल्याची गंभीर माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्राथमिक चौकशीतून निदर्शनास आली असल्यामुळे उक्त ५२९ प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) तसेच, मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी लाच घेण्याच्या प्रकरणामध्ये अन्य किती व्यक्तींचा समावेश आहे याबाबतची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सर.ज.जी, रुग्णालयातील ऑर्गन ट्रान्सप्लांट कोर्डीनेशन तुषार सावरकर (समाजसेवा अधिक्षक) याने रहेजा रुग्णालय येथील खाजगी इसम, सचिन साळवे याच्या मार्फतीने श्री. जमालउद्दीन यांच्या

किडनीच्या ऑपरेशन करीता सर.ज.जी. रुग्णालयातील ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटीची परवानगी मिळऊन देण्याकरीता १,५०,०००/- रुपयाची लाचेची मागणी करून त्यापैकी रु. ८०,०००/- इतकी रक्कम खाजगी इसमाकरवी स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले. आरोपी लोकसेवक तुषार सावरकर आणि खाजगी इसम सचिन साळवे यांच्याविरुध्द गु.र.क्र. ३२/२०१८ कलम ७, ७(अ), १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (दि. २६.०७.२०१८ सुधारणा नुसार) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व सदर गुन्हयात त्यांना दिनांक ०१.१०.२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) (३), (४) व (५), प्रस्तुत गुन्हयाच्या वेळी, आरोपी लोकसेवक तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, अवयव प्रत्यारोपण समिती, सर.ज.जी, रुग्णालय, मुंबई यांच्या कार्यालयातुन मुत्रपिंड व यकृत प्रत्यारोपण एकुण ५३९ नस्ती ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत. तसेच, आरोपी लोकसेवक तुषार सावरकर यांना संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी दि. ०४.१०.२०१८ रोजीच्या आदेशान्वये अटकेच्या दिनांकापासून निलंबित केले असून संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे.

-----------------

## राज्यातील वाढत्या सायबर गुन्हयांवर सक्षम उपाययोजना करण्याबाबत

**(१४) * १२७४२५ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव**

**शेरी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील गणेशखिंड रस्त्यावरील कॉसमॉस बँकेच्या मुख्यालयात असलेले एटीएम सर्व्हर स्विच (सर्व्हर) हॅक करुन हॅकर्सनी सुमारे रुपये ९४ कोटी ४२ लाख इतकी रक्कम भारतासह २९ देशांमधील एटीएममधून काढल्याचा प्रकार दिनांक १० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला असून याबाबतची तक्रार पुणे येथील चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सायबर प्रकल्पांतर्गत सर्व जिल्ह्यांमध्ये अद्ययावत ४७ सायबर पोलीस ठाणे सुरु करण्याची घोषणा दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली असून त्यासाठी रुपये ६५० कोटीचा निधी देण्याची ग्वाही देण्यात आलेली असतानाही अद्यापपर्यंत सायबर पोलीस ठाणे उभारण्यात आले नसून सध्या पोलीसांच्या सायबर सेल मधूनच सीडीआर (कॉल डिटेल्स रेकॉर्ड) आणि एसडीआर (सबस्क्राईबर डिटेल्स रेकॉर्ड) तपासणीचे काम करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याच अनुषंगाने ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत नवीन दिवा येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरी सहकारी बँक असोसिएशनने नॉलेज हब उभारण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये घेतला असून डेबिट कार्ड क्लोनिंग, सायबर हल्ला, लेखापरीक्षणातील त्रुटी अशा विविध अडचणींची देवाणघेवाण आणि त्यावरील उपायांची माहिती या हबच्या माध्यमातून बँकांना उपलब्ध होणार असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, वाढते सायबर क्राईम, एकविसाव्या शतकातील आव्हाने व त्यावरील उपाययोजना करण्यासाठी केंद्राच्या गृह खात्याने श्री.मधुकर गुप्ता या समितीची स्थापना केली असून अद्यापपर्यंत राज्यातील गृह विभागाने सदर समितीकडे सुचना पाठविण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) राज्यात गत वर्षी ४ हजार ३५ सायबर गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी १ हजार ३७ गुन्ह्यांचा तपास करण्यात आला, यावर्षी ४१ टक्क्यांनी सायबर गुन्हे वाढले असून सायबर गुन्ह्यात मुंबईत सर्वाधिक गुन्ह्याची नोंद झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सायबर गुन्हे रोखण्यासाठी आवश्यक असलेले आधुनिक प्रशिक्षण म्हणजे क्रिप्टोग्राफी, नेटवर्क, फॉरेन्सिक, मोबाईल डाटा फॉरेन्सिक, पेनेट्रेशन, लिनक्स ऑपरेटिंग, फायरवाल, हॅकिंग, क्लाऊड कॉम्पुटिंग इ. पोलीस दलामध्ये वाढविण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, राज्यात सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता सायबर पोलीस ठाणे केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे तसेच सायबर गुन्हे रोखण्यासाठी आवश्यक असलेली आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यातील सर्व जिल्हे व पोलीस आयुक्तालय मध्ये मिळून एकूण ४७ सायबर लॅब दिनांक १५.०८.२०१६ पासून सुरु करण्यात आल्या आहेत. सायबर गुन्ह्याची तात्काळ दखल घेता यावी व तपासाला गती मिळावी याकरिता शासन अधिसूचना दिनांक १५.११.२०१६ नुसार सर्व जिल्ह्यातील/ आयुक्तालयातील ४३ सायबर लॅबना 'सायबर पोलीस ठाणे 'असे घोषित करण्यात आले आहे. यापैकी आता पर्यंत ३६ सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित झाले आहेत. उर्वरित ७ सायबर पोलीस ठाणे कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच वरील प्रमाणे सुरु करण्यात आलेल्या सायबर लॅब/पोलीस ठाणे यांना गुन्हे तपासाकरिता आधुनिक यंत्रसामुग्री (सॉफ्टवेअर व हार्डवेअर) पुरविण्यात आल्या आहेत. तसेच Intellinex (CDR Analysis) या टुलमार्फत सीडीआर/एसडीआर तपासणीचे काम केले जाते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोशियनने जिल्ह्यातील सर्व सदस्य नागरी बँकांचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी व माहिती तंत्रज्ञान प्रमुख यांची संयुक्त सभा ऑगस्ट २०१८ मध्ये आयोजित केली होती. नॉलेज हब स्थापना करण्याची बाब पुणे जिल्हा नागरी बँक असोशियन यांच्या स्तरावर सुरु आहे.

सायबर हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी प्रधान सचिव (सहकार) यांचे समवेत विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) व राज्यातील सर्व नागरी सहकारी बँका व सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे प्रतिनिधी (प्रत्येक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ कार्यकारी संचालक व बँकेचे Cyber Intelligence and Security Officer किंवा सदर विषय हाताळणारे आय. टी. विभागातील अधिकारी) यांची दिनांक २७.९.२०१८ रोजी माटुंगा मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. राज्यातील सर्व नागरी सहकारी बँकांना यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) मधुकर गुप्ता समिती ही केंद्र शासनाने केंद्रीय गृह विभागाच्या संघटना, रचना व कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता स्थापन केली आहे.

(६) राज्यात माहे ओक्टोबर २०१७ पर्यंत २६५४ सायबर गुन्हे नोंदविण्यात आले होते तर माहे सप्टेंबर २०१८ पर्यंत २९४५ सायबर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. राज्यात मुंबईत सर्वाधिक सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे हे खरे आहे.

सायबर गुन्हे रोखण्याकरीता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरीता वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून यामध्ये सी डॅक या संस्थेच्या मार्फतीने, १३८ अधिकारी यांना दिनांक २१.११.२०१६ ते दिनांक ११.०२.२०१७ या दरम्यान प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सायबर लॅबकरिता खरेदी करण्यात आलेल्या सायबर फॉरेन्सिक टूल्स व तंत्रज्ञान याबाबतचे वेंडर टूल्स ट्रेनिंगद्वारे दोन टप्प्यात दि. ११.०९.२०१७ ते ०७.११.२०१७ या दरम्यान एकूण ४९ पोलीस अधिकारी व ११ पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सतर्कता जागरूकता सप्ताह अंतर्गत बॅक ऑफ इंडिया, बेलापूर, नवी मुंबई यांचे तर्फे महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता

दिनांक ०१.११.२०१८ व दिनांक ०२.११.२०१८ अशी दोन दिवस कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. एकूण ४९ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कार्यशाळेत सहभाग घेतलेला आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील जेएनपीटीने आपल्या मालकीच्या भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनींचे भाडे कंपन्यांनी थकविल्याबाबत

**(१५) * १३१३३५ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) येथील जेएनपीटीने आपल्या मालकीच्या अनेक जमिनी तेल, रासायनिक, शिपिंग कंपन्यांना व्यवसायासाठी भाडेतत्त्वावर दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र यातील अनेक बड्या कंपन्यांनी सन १९९४ पासून जेएनपीटीचे रुपये ४८४ कोटी थकविले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने हस्तक्षेप करुन सदर कंपन्यांकडून जेएनपीटीला त्याचे थकीत भाडे वसूल करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त हे मोठे बंदर असून ते केंद्र शासनाच्या पोत परिवहन मंत्रालय, भारत सरकार यांच्या अखत्यारीत येते. जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त यांनी दिलेल्या माहितीनुसार कंपन्यांकडून थकीत भाडे वसुलीच्या अनुषंगाने जेएनपीटीने आब्रिट्रेशन ॲन्ड कॉन्सिलिएशन कायदा,

१९१६ मधील कलम ३४ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे Arbitration Petition दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) भागात एन.के.कॅसल ग्रुपच्या विकासकाने गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(१६) * १२९१५० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एन.के.कॅसल ग्रुपच्यावतीने सन २०११ मध्ये एन.के.गार्डन नावाने वावंजे गावात गृहनिर्माण प्रकल्पात सदनिकेची नोंदणी करण्यासाठी गरजूंकडून ३ कोटी रूपये जमा करून सन २०१५ अखेरपर्यंत सदनिकेचा ताबा देण्याचे आश्वासन देवूनही अद्यापपर्यंत गुंतवणूकदारांना सदनिकेचा ताबा मिळाला नसून सदर बांधकामही सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एन.के.कॅसल ग्रुपच्या विकासकाने गुंतवणूकदारांची ३ कोटी रुपयांची फसवणुक केल्याने गुंतवणूकदारांनी वाशी पोलीस ठाण्यात विकासक श्री.एन.के.भूपेशबाबु, त्यांच्या पत्नी श्रीमती प्रीथा भुपेशबाबु या दोघांविरोधात फसवणूकीसह, मोफा कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, एन.के. गार्डन गृह प्रकल्पात सदनिकेसाठी गुंतवणूक केलेल्या गरजूंना त्यांची भरलेली रक्कम विनाविलंब मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून २ आरोपींविरूद्ध वाशी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३५०/२०१८ भादंवि कलम ४०६, ४२०, ३४ सह महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅटस (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे त्यांची विक्री व्यवस्थापन व हस्तांतरण) चे अधिनियम १९६३ कलम ३(फ) १३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) सदर प्रकरणी गुंतवणूकदारांनी (Maharashtra Real Estate Regulatory Authority Mumbai (MAHARERA) यांचकडे तक्रार केल्यानंतर (MAHARERA) यांनी गुंतवणूकदारांना त्यांच्या फ्लॅटचा ताबा मिळेपर्यतच्या काळातील पिडीतांना गुंतवणूक केलेल्या रक्कमेवर १०.५ टक्के व्याज देण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरात दररोज जमा होणाऱ्या जैव वैद्यकिय कचऱ्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(१७) * १३०८२४ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात दररोज सुमारे ८०० किलो जैव वैद्यकिय कच-याची विल्हेवाट लावण्यात येत असल्याने परिसरात धूर आणि दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(२) कोल्हापूर महानगरपालिकेच्या अहवालानूसार वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने तपासणी केली असता अशी बाब निदर्शनास आली नाही.

• महानगरपालिकेकडील कुशल अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियम व मार्गदर्शक सूचनानुसार सदरचा प्रकल्प सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना बोर्डातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत

**(१८) * १३०३२७ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासकीय अधिकारी व कर्मचा-यांची दर तीन वर्षांनी बदली करणे अनिवार्य असतांना मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना बोर्डातील अधिकारी श्री किशोर जगताप व श्री.अनिरूध्द आबेगांवकर यांची बदली करण्यात आली नसून विक्रोळी पुर्व, कन्नमवार नगर व मुलुंड गव्हाण पाडा येथील संक्रमण शिबीरातील गाळे बनावट कागदपत्रांच्या आधारे वितरीत करून त्यांनी गैरव्यवहार केला असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधिनी यांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) याप्रकरणी मिळकत व्यवस्थापक, श्री.किशोर जगताप यांच्याविरुध्द स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून तक्रार प्राप्त झाली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपमुख्य अधिकारी/संक्रमण गाळे यांनी चौकशी पूर्ण करुन सचिव/प्राधिकरण यांना

अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या आधारे सचिव/प्राधिकरण यांनी दि.०५.१०.२०१८ च्या आदेशान्वये श्री.जगताप यांची अमरावती मंडळ येथे बदली केली आहे.

श्री.अनिरुध्द आबेगांवकर यांच्याविरुध्द संक्रमण शिबीर संदर्भात कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ट्रायसेम प्रशिक्षण केंद्रे व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मिनी आयटीआय) बंद केली असल्याबाबत

**(१९) * १२७०७४ श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील युवकांना व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या सहकार्याने सुरु केलेली २७ ट्रायसेम प्रशिक्षण केंद्रे व ३० लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मिनी आयटीआय) बंद करण्याचा शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास ग्रामविकास विभागाने काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निर्णय घेतल्यामुळे या केंद्रात काम करणा-या कंत्राटी प्रशिक्षकांवर बेरोजगार होण्याची वेळ आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रशिक्षण केंद्रातील कर्मचा-यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे व तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

उपरोक्त शासन निर्णयास दिनांक २४.९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

(३) व (४) केंद्र शासनाने उपरोक्त योजना दिनांक १.४.१९९९ पासून बंद केली होती. तथापि, साधन सामुग्री वाया जाऊ नये म्हणून राज्य शासनाने ही योजना सुरु ठेवली होती.

• या योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा कालावधी कमी असणे, पांरपारिक ट्रेडचे प्रशिक्षण देणे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ITI केंद्रांच्याच ठिकाणी मिनी आय टी आय केंद्र कार्यरत असणे, प्रशिक्षण देणारा कर्मचारी वर्ग आधुनिक ट्रेडसाठी त्या प्रमाणात प्रशिक्षित नसणे, प्रशिक्षणार्थी कमी असणे यामुळे उपरोक्त दिनांक १.८.२०१८ चा शासन निर्णय घेण्यात आला होता. ज्यास नंतर स्थगिती देण्यात आली आहे.

• तथापि, ट्रायसेम व मिनी आयटीआय प्रशिक्षण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी शासन सेवेत नियमित करण्याबाबत विविध न्यायालयात याचिका दाखल केलेल्या असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवापूर (जि.नागपूर) येथे एका विद्यार्थीनीचा ट्रकने दिलेल्या धडकेत झालेला मृत्यू

**(२०) * १२८९३५ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर (जि.नागपूर) येथे दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास शाळेतून घरी येणाऱ्या विद्यार्थीनीला भरधाव वेगात असलेल्या ट्रकने दिलेल्या धडकेत त्या विद्यार्थीनीचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुर्घटनेनंतर संतप्त झालेल्या जमावाने नागपूर-गडचिरोली मार्गावर निदर्शने केल्यामुळे जमावाला आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांनी केलेल्या गोळीबारासंदर्भात व झालेल्या अपघातासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अपघातात मृत्यूमूखी पडलेल्या विद्यार्थीनीच्या कुटूंबियांना कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर घटना दिनांक १५.०९.२०१८ रोजी घडली आहे. पवनीकडून नागपूरकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातामध्ये एक मुलगी मृत तर ४ मुली जखमी झाल्या आहेत.

(२) पोलीसांनी गोळीबार केला हे खरे नाही.

दुर्घटनेनंतर संतप्त झालेल्या जमावाने नागपूर - गडचिरोली मार्गावर निदर्शने केली आणि भिवापूर शहरात टायर पेटवले. तसेच पोलीस स्टेशन आवारात येऊन पोलीस कर्मचारी आणि पोलीस स्टेशन आवारामधील जप्त वाहनांवर दगडफेक करुन शासकीय तसेच खाजगी मालमत्तेचे नुकसान केले. संतप्त जमावाला पांगविण्यासाठी अश्रुधुराचा (स्टनसेल) वापर करण्यांत आला.

(३) व (४) पोलीसांनी कोणत्याही प्रकारचा गोळीबार केलेला नसल्याने चौकशी करण्यांत आली नाही. मात्र, झालेल्या ट्रक अपघातासंबंधात चौकशी करुन अप.क्र. ४२३/२०१८, कलम २८९, ३३७, ३०४अ भा.दं.वि. सह कलम १८४ मो.वा.का. अन्वये दिनांक १५.०९.२०१८ रोजी गुन्हा नोंद करण्यांत आला आहे.

तसेच अपघातानंतर जमावाने भिवापूर शहरात टायर जाळून, दगडफेक करुन पोलीस कर्मचाऱ्यांना जखमी केल्याने तसेच शासकीय व खाजगी मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत चौकशी करुन अप.क्र. ४२४/२०१८, कलम

३५३, ३४१, ४३५, ३३२, १८८, १८९, ४२७, १४३, १४७, १४९ भा.दं.वि. सह कलम १३५ म.पो.का. अन्वये दिनांक १५.०९.२०१८ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपी ट्रकचालक (रा.जमशेदपूर) यास दिनांक १५.०९.२०१८ रोजी अटक करुन त्यास न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.

अपघातग्रस्त विद्यार्थीनीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याकरीता डिआरए फॉर्ममध्ये माहिती भरुन अपघात दावा प्राधिकरण, नागपूर यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

(५) कोणत्याही प्रकारचा विलंब झालेला नाही.

-----------------

## ओवळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ज्वलनशील केमिकल्सच्या गोदामांना लागलेली आग

**(२१) * १२७०१२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम**

**शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओवळी (ता.भिवंडी, जि.ठाणे) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील वेदांता ग्लोबल वेअर हाऊस व पारसनाथ कॉम्प्लेक्स या ज्वलनशील केमिकल्सच्या गोदामाला दिनांक १९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गोदामात हायड्रोजन पेरॉक्साईड व सोडियम नायट्रोजन तसेच अन्य प्रकारचे घातक केमिकल्सचे ड्रम बेकायदेशीर साठवून ठेवल्याने स्फोट होऊन आग लागली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील काल्हेर, कोपर, दापोडा, अंजुरफाटा, कोरेगाव, पुर्णा, कशेळी अशा विविध ग्रामपंचायत हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदा गोदामांत केमिकल ऑईल व विविध मालांची साठवणूक केली असून या गोदामांवर कारवाई करण्याचे वारंवार आदेश देऊन सुध्दा अद्यापही कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गृहराज्यमंत्री महोदयांनी १५ दिवसात अनधिकृत केमिकल्स गोदामांवरती कारवाई करण्याचे आश्वासन माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भिवंडी (जि.ठाणे) शहरासह ग्रामीण परिसरात सुरक्षिततेचे सर्व नियम धाब्यावर बसवून महसूल, पोलिस, व नगरपालिका प्रशासनाच्या संगनमताने अनधिकृत गोदामांची उभारणी केली जात असूनही अद्यापही कोणतीच कारवाई झाली नाही तसेच, बिनशेती व प्राधिकरणाची कोणतीही परवानगी नसताना अनधिकृत केमिकल्स चा साठा या संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांना दै. सहकार संदेश चे संपादक यांनी तक्रार निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने येथे लागणा-या आगींची उच्चस्तरीय चौकशी करुन बेकायदा अनधिकृत गोदांमांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरण नारपोली पोलीस स्टेशन येथे अकस्मात जळीत क्र. २२/२०१८ प्रमाणे दाखल केला असून सदर प्रकरणाची चौकशी पोलीस खात्यामार्फत सुरु आहे. सदर गाळ्यास आग निश्चित कोणत्या कारणाने लागली याबाबतचा अहवाल केमिकल ॲनालायझर यांचेकडून प्राप्त होणे बाकी आहे.

(३) नाही.

(४) व (५) होय.

(६) तहसिलदार, भिवंडी यांचे कार्यालयाकडून दिनांक १२/०३/२०१५ रोजी प्राप्त झालेल्या भिवंडी परिसरातील १९३ रासायनिक गोदामांची यादीमधील १४२ प्रकरणी प्राधिकरणामार्फत नियमानुसार स्थळ पाहणी अहवाल तयार केल्यानंतर त्यापैकी १२२ प्रकरणी नोटीस कार्यवाही पुर्ण करुन २९ प्रकरणी निष्कासनाचे अंतीम आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित ९३ प्रकरणावर कार्यवाही सुरु आहे. निष्कासनासाठी अंतिम केलेल्या २९ प्रकरणी निष्कासनासाठी पोलीस बंदोबस्ताची मागणी केली असुन ३ प्रकरणी पोलीस बंदोबस्त प्राप्त होऊन निष्कासन कार्यवाही करण्यात आली आहे.

नारपोली पोलीस स्टेशनमध्ये सन २०१६, सन २०१७ व सन २०१८ मध्ये बेकायदेशीर केमिकल साठा करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यातील बहुतांशी प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

-----------------

## मुंबईतील जोगेश्वरी मजासवाडी येथील भूखंड प्रकरणी महानगरपालिका शिपायाची हत्या झाल्याबाबत

**(२२) * १२६५८१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी मजासवाडी येथील महानगरपालिकेच्या ३.३ एकराच्या भूखंडावर आरक्षण रद्द करणेबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याच्या आयुक्त

महानगरपालिका यांनी फाईलवर लिहिलेल्या शेऱ्यामध्ये अधिकारी व शिपायाने आणि विकासकाच्या माणसाने संगनमताने खाडाखोड करून, मा.न्यायालयात जाऊ नये, असा शेरा लिहिल्याचे  उघडकीस आले असता, श्री.वाल्मिकी या शिपायाची झालेली संशयास्पद हत्या प्रकरणाची तक्रार आझाद मैदान पोलीस ठाण्यात दिनांक १ जून, २०१८ रोजी व त्यासुमारास दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेचा शासनाने सखोल तपास केला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबईतील जोगेश्वरी, मजासवाडी येथील महानगरपालिकेच्या ३.३ एकराच्या भुखंडावर आरक्षण रद्द करणेबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा आयुक्त, महानगर पालिका यांनी फाईलवर लिहिलेल्या शेऱ्यामध्ये खाडाखोड करुन न्यायालयात  जाऊ नये, असे शेरा लिहिल्याचे उघडकिस आल्याने, त्यासंदर्भात तक्रारीवरुन आझाद मैदान पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२९/२०१८, कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या गुन्हयात एकुण ६ आरोपी निष्पन्न झाले असून सदर गुन्हयात भा.दं.वि. १२०(ब) कलम वाढविण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्ह्यातील मयत आरोपी (महानगरपालिका शिपाई) याच्या मृत्यूबाबत कुर्ला रेल्वे पोलीस ठाणे येथे नोंद क्र. १५३/१८ अन्वये अपमृत्यू नोंद असल्याबाबत माहिती प्राप्त झाली असून याप्रकरणी मोटरमनने दिलेल्या जबाबावरुन दि. ०१.०६.२०१८ रोजी विक्रोळी ते घाटकोपर दरम्यान पुर्व दिशेकडुन पश्चिम दिशेकडे ट्रॅक क्र. ५ ओलांडतांना रेल्वेची धडक लागल्याने गुन्ह्यातील आरोपी मयत झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली, खामगांव (जि.बुलढाणा) व बोपी (जि.अमरावती) येथील उद्योगपतीनी बँकेसह व्यापाऱ्यांची कोट्यवधी रुपयांची केलेली फसवणूक

**(२३) * १२६८८५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली, खामगांव (जि.बुलढाणा) व बोपी (जि.अमरावती) येथील ऑईल रिफायनरी तसेच सॉलव्हंट प्रकल्पाच्या व्यवहारात पुरवठादाराचे कोट्यवधी रूपये तसेच जीएसटीच्या स्वरूपात रुपये २०५ कोटीहून अधिक रक्कम बुडविणारा उद्योगपती श्री.नितिन जाधव याच्यासह त्याचा साथीदार श्री.मुन्ना पाटील याला सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) विदेशात फरार होण्याआधीच मुंबई विमानतळावर दिनांक २२ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगपती श्री. नितिन जाधव यांनी व्यापारी व बँकाची रुपये ६०० कोटीपेक्षा जास्त रक्कमेने फसवणुक केली असून केवळ अमरावती विभागात व्यापाऱ्यांची व्हॅट, जीएसटी आणि टीडीएसच्या नावावर सुमारे रुपये २५० कोटीपेक्षा जास्त रक्कमेची तसेच अमरावती जिल्ह्यात एसबीआय, युनियन बँकसह पाच वेगवेगळ्या बँकेकडून प्रत्येकी रुपये २० कोटीचे कर्ज घेऊन फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद येथील रहिवासी असलेले श्री.नितिन जाधव मुंबई येथे राहत असून बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स येथे मुख्य कार्यालय असून अकोला -अमरावती राज्य मार्गावरील बोपी येथे गजानन ऑईल मिल, खामगाव येथे गजानन सॉलव्हंट आणि गजानन रिफायनरी, हिंगोली येथे गजानन गंगामाई मिल यासह अनेक उद्योग असल्याची माहिती निर्देशनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व चौकशीचा तपशिल काय आहे व तद्नुसार या गंभीर प्रकरणी कोणकोणत्या व्यक्तींवर व संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सक्त वसुली संचालनालय हे केंद्र शासनाचे अभिकरण असून ते राज्य शासनाच्या अखत्यारीत नाही. त्यांच्याकडून प्राप्त माहीतीनुसार अशी कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

(२) याबाबत कुठलीही तक्रार बुलढाणा, अमरावती (ग्रा) व अमरावती शहर या पोलीस घटकाकडे दाखल नाही. तथापि श्री.बाबुराव पांडुरंग रणभाडे, रा.कल्याण, कामगार पुरवठादार, यांनी सदर कंपनीविरूद्ध थकीत रक्कम मिळण्यासाठी तक्रार अर्ज दाखल केला असून सदर अर्ज तपासावर प्रलंबित आहे.

(३) मे. गजानन ऑईल प्रा.ली. या कंपनीचा नोंदणी दाखल्यानुसार मुख्यालयाचा पत्ता कार्यालय क्र. ९०२, ९ वा मजला, जोगेश्वरी पुर्व, मुंबई वीवा हबटाऊन, ग्रेटर मुंबई, मुंबई असा आहे. श्री.नितीन जाधव यांची गजानन सॉलव्हंट आणि गजानन रिफायनरी पोलीस स्टेशन जलंब हद्दीत ग्राम सुजातपूर, जिल्हा बुलडाणा येथे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार श्री. रणगाडे यांच्या तक्रारअर्जाच्या अनुषंगाने तक्रारदारास चौकशीसाठी पोलीस स्टेशन, जलंब येथे बोलावले असता तक्रारदार यांनी त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे ते चौकशीस हजर राहू शकत नसल्याबाबत कळविले आहे. सध्या तक्रारदार यांचा अर्ज चौकशी कामी पोलीस स्टेशन, जलंब येथे प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्थिकदृष्ट्या मागास लाभार्थ्यांसाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या माध्यमातून उद्योग, व्यवसायासाठी बँकांनी विनातारण जमीन कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतचा अध्यादेश

**(२४) * १२७४८५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थिकदृष्ट्या मागास लाभार्थ्यांसाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या माध्यमांतून उद्योग, व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत राज्यातील बँकांना विना तारण जमीन कर्ज देण्याबाबत सरकारने अध्यादेश नुकताच काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात २५ हजार हून अधिक अर्ज आले असताना आतापर्यंत बँकांकडून केवळ ६०० जणांना कर्ज दिले असून हिंगोली जिल्ह्यात महामंडळाने १६० सशर्त प्रमाणपत्र दिलेल्या प्रस्तावांपैकी फक्त ५ प्रस्तावांना बँकांनी मंजूरी दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत जी पात्र प्रकरणे सहकारी व राष्ट्रीयकृत बँकाकडे पाठविण्यात आली आहेत

त्या प्रकरणांना तात्काळ मंजुरी देण्यात यावी असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले असल्याचे माहे जुलै, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

महामंडळ वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देत नसून व्याज परताव्याचा लाभ देत आहे. कर्ज मंजूरीची प्रक्रीया बँक राबविते. वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना ही बँक सुलभ होण्याकरिता कर्ज रक्कमेस पत हमी देण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ०५/११/२०१८ पर्यंत वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत एकूण २४८३९ उमेदवारांना पात्रता प्रमाणपत्र निर्माण केले आहे. त्यातील १०१७ उमेदवारांना बँकेमार्फत कर्ज मंजूरी झाली आहे. हिंगोली जिल्ह्यातील २४७ उमेदवारांनी पात्रता प्रमाणपत्र निर्माण केले आहे. त्या जिल्ह्यातील एकुण सहा प्रस्तावांना बँकेची मंजूरी प्राप्त आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ३० जुलै, २०१८ रोजी बोलविलेल्या बँक प्रतिनिधींच्या बैठकीमध्ये ज्या इच्छूक उमेदवारांनी पात्रता प्रमाणपत्र निर्माण केलेले आहे, त्यांनी दिलेल्या व्यवसायाच्या बँकेबल प्रोजेक्टला कर्ज देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.

(४) महामंडळ वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देत नसून व्याज परताव्याचा लाभ देत आहे. कर्ज मंजूरीची प्रक्रीया बँक राबविते. वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना ही बँक सुलभ होण्याकरिता कर्ज रक्कमेस पत हमी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ढाळघर (ता.माणगाव, जि.रायगड) गावात डिटोनेटर्स आणि जिलेटिनच्या सहाय्याने बनविण्यात येणाऱ्या स्फोटकाचा साठा पोलिसांनी जप्त केल्याबाबत

**(२५) * १२७६९६ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढाळघर (ता.माणगाव, जि.रायगड) गावात डिटोनेटर्स आणि जिलेटिनच्या सहाय्याने बनविण्यात येणाऱ्या स्फोटकाचा साठा पोलिसांनी माहे सप्टेंबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्फोटकाच्या साठ्यात डिटोनेटर्स व जिलेटिन आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी आरोपींनी विनापरवाना असुरक्षित स्फोटके एकूण ९६५ इलेक्ट्रॉनिक डेटोनेटर (ईडी कॅप) व ४६ जिलेटीन कांड्या जवळ बाळगल्याचे चौकशीत/ तपासात मिळून आले. या प्रकरणी तीन आरोपींविरुध्द माणगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर १५४/२०१८, भारताचा स्फोटक अधिनियम १९०८ चे कलम ४ व ५ प्रमाणे दि. ३.९.२०१८ रोजी गुन्हा नोंदविला आहे. सदर गुन्ह्यातील तीनही आरोपींना अटक केली असून सध्या ते जामिनावर मुक्त आहेत. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील हिंजवडी आयटी पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावरील वाहतूक कोंडीमुळे ५६ कंपन्यांनी स्थलांतर केल्याबाबत

**(२६) * १२६५६५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील हिंजवडी आयटी पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे गत दोन वर्षात दोन महत्वाच्या कंपन्या बालेवाडी आणि खराडी येथे स्थलांतरित झाल्या असतानाच आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या सहा बहुराष्ट्रीय कंपन्या व ५० लहान कंपन्यांनी हिंजवाडी आयटी पार्कमधून स्थलांतर केले असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयटी पार्कची अवस्था रोजगारांच्या दृष्टीने बिकट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाहतूकीची कोंडी दूर करण्याच्या

दृष्टीने व पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यान, हिंजवडी या आयटी पार्कमधील कोणत्याही कंपनीचे स्थलांतर झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महामंडळाने माहिती तंत्रज्ञान उद्यानात महामंडळाने सर्व पायाभूत सुविधा डांबरी रस्ते, जल शुध्दीकरण केंद्र, मलनि:सारण केंद्र, वीज पुरवठा, अग्निशमन केंद्र, पथदिवे इ. आवश्यक सर्व सोईसुविधा या आधीच कार्यान्वीत केल्या आहेत.

वाहतुक कोंडी दुर करण्याच्या दृष्टीने पोलीस विभागामार्फत एकेरी वाहतूकीचा प्रयोग राबविण्यात आला असून बऱ्याच प्रमाणात वाहतूक कोंडी कमी करण्यात आली आहे. महामंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या वाकड चौक ते शिवाजी चौक व शिवाजी चौक ते विप्रो सर्कल २ पोहच रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले आहे. तसेच महामंडळाने विनोदे वस्ती ते टाटा जॉन्सन या नवीन सहा पदरी रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण केलेले आहे. विप्रो सर्कल फेज २ ते इन्फोसिस सर्कल फेज २ या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम प्रस्तावित आहे. चांदे ते माण या जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्त्याचे मजबुतीकरण व पुर्नअस्तरीकरणाचे काम सूरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोवंडी (मुंबई) संजयनगर येथील महानगरपालिकेच्या उर्दू माध्यमाच्या शाळेतील २२० विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा

**(२७) * १२७२०० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित**

**विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) संजयनगर येथील महानगरपालिकेच्या उर्दू माध्यमाच्या शाळेतील २२० विद्यार्थ्यांना दिनांक १० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास विषबाधा झाली असून त्यापैकी कु.चांदनी शेख या १२ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेत विद्यार्थ्यांना दिलेल्या फॉलिक ॲसिड च्या गोळ्यांमधून विषबाधा झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांच्या पालकांकडून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शाळेत विद्यार्थ्यांनी खिचडी खाल्यामुळे विषबाधा होण्याचे अनेक प्रकार घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत अहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गोवंडी (मुंबई) संजयनगर येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ऊर्दु माध्यमाच्या शाळेतील २२० विद्यार्थ्यांना विषबाधा झाली ही बाब खरी नसल्याचे, तसेच कु.चांदनी शेख या १२ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू विषबाधेमुळे झाला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्यामध्ये शालेय पोषण आहारामधून विषबाधेच्या घटना घडल्या असून, विषबाधा प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्या बचतगटांवर काम काढून घेणे, दंडात्मक कारवाई करणे, संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

करणे तसेच, संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास निलंबित करणे, वेतनवाढ रोखणे इत्यादी प्रकारच्या कारवाया करण्यात आल्याचे शालेय पोषण आहार योजना, स्वतंत्र कक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील परीक्षा विभागातील अधिकाऱ्याने परिक्षांमध्ये केलेला गैरप्रकार

**(२८) * १३१४९९ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील एका उच्च पदस्थ अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने बनावट पत्रवाटप केल्याच्या सुमारे ४० तक्रारी आणि विद्यापीठातील परीक्षेतील गैरप्रकाराच्या विविध तक्रारी वांद्रे-कुर्ला संकुल पोलिसांकडे कार्यवाहीविना पडून असल्याची गंभीर बाब दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गंभीर प्रकाराची दखल घेवून शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मुंबई विद्यापीठातील परीक्षेत झालेल्या गैरप्रकारातील दोषींना पाठीशी घालणाऱ्या वांद्रे-कुर्ला संकुलातील पोलीस अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच मुंबई विद्यापीठातील परीक्षा गैरप्रकाराच्या चौकशीसाठी शासन विशेष चौकशी पथकाची नेमणूक करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रस्तुत प्रकरणी उपकुल सचिव, मुंबई विद्यापीठ यांच्या फिर्यादीवरुन बी.के.सी. पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.

३००/१८, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ अन्वये अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये बनावट सहीचे मुंबई विद्यापीठाचे लेटरहेड हे त्यांच्या कार्यालयातील असल्याचे व त्यावरील सही ही नमूद विभागाचे उपकुल सचिव यांची नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा तपासाधिन असून सदर गुन्ह्याच्या तपासात पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-८, मुंबई हे वैयक्तिकरित्या लक्ष देत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील चेंबूर वाशीनाका येथील डॉ. भिमराव आंबेडकर विद्यालय आणिक-पांजरापेळ जोड रस्त्यात प्रकल्पबाधित झाल्याबाबत

**(२९) * १३०११२ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर वाशीनाका येथील डॉ.भिमराव आंबेडकर विद्यालय ही मराठी माध्यमाची शाळा आणिक-पांजरापेळ जोड रस्त्यात प्रकल्पबाधित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पबाधित शाळेला वाशीनाका चेंबूर, येथील कुकरेजा-फेज-१ मधील प्लॉट नंबर २६२ ए/१ मधील जागा वितरित करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १५ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवदेनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) प्रश्नाधिन विद्यालयाचे एकूण क्षेत्रफळ २३६८ चौ.फूट इतके होते. सदर विद्यालयास कुकरेजा वसाहत, वाशीनाका येथील इमारत क्र.३४ व ३६ मधील ३३७५ चौ.फूट क्षेत्राच्या १५ सदनिका मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राधिकरणाने वितरीत केल्या आहेत. विद्यालयाच्या स्वतंत्र भूखंडाची मागणीबाबत विविध मुद्यावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.

मुंबईतील चेंबूर वाशीनाका येथील डॉ. भिमराव आंबेडकर विद्यालय या मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आलेली नाही. यास्तव, सदर शाळा शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून अनधिकृत जाहिर करण्यात आली असून सदर शाळेस अनुक्रमांक उपशिअ/अनु/टेक्र.२/ओडी/०२, दि. १६.०६.२०१७ व क्र.उपशिअ/अनु/ओडी/०७, दि. १०.०४.२०१८ अन्वये शाळा बंद करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सूचनापत्रे बजविण्यात आली आहेत.

-----------------

## केंद्र शासनाच्या बीएसयूपी योजनेंतर्गत कल्याण शहरातील लाभार्थ्यांना घरे देण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(३०) * १२६६५४ श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या बीएसयूपी योजनेंतर्गत कल्याण शहरातील गरिबांसाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने बांधून तयार असलेली घरे सात वर्षे उलटून गेली तरीही गरीब गरजू लाभार्थ्यांना दिली गेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची घरे लाभार्थ्यांना विनाविलंब देण्याबाबत एका राजकीय पक्षाने आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची घरे लाभार्थ्यांना देण्याबाबत होत असलेल्या विलंबाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदरची घरे गरीब लाभार्थ्यांना किती कालावधीत उपलब्ध केली जाणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

सदरहू योजनेंतर्गत बांधून पूर्ण झालेली घरकुले पात्र लाभार्थ्यांना वेळोवेळी वितरीत करण्यात आलेली आहेत. तथापि, पुरेसे लाभार्थी नसल्यामुळे काही सदनिका अवितरीत आहेत.

(२) विधानमंडळ सदस्य श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेच्या वतीने कल्याण-डोंबिवली येथील इंदिरानगर मधील लाभार्थ्यांसंदर्भात दि.१६.०२.२०१८ रोजी तसेच रस्ता रुंदीकरणात बाधीत लाभार्थ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी, अपात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पुनश्च: छाननी करण्याबाबत आणि प्रत्येक बेघराला प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे देण्याबाबत आदी प्रमुख मागण्यांसह दि.११.०५.२०१८ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे निवेदन सादर केले आहे. तसेच कल्याण (पश्चिम), इंदिरानगर येथील बीएसयुपी योजनेंतर्गत पात्रता निश्चित न झालेल्या १४७ झोपडीधारकांच्या पुनर्वसनासंदर्भात इंदिरानगर विकास संघ यांचे दि.१७.०७.२०१८ रोजीचे निवेदनही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(३) या योजनेंतर्गत बांधण्यात आलेली व विनावापर पडून असलेली घरकुले खालील ३ गटातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय दि.२५.०९.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(१) IHSDP व BSUP योजनांतर्गत घरकुलांच्या लाभापासून वंचित राहिलेले मुळ पात्र लाभार्थी,

(२) ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये IHSDP व BSUP अंतर्गतची घरकुले उपलब्ध आहेत तेथील प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थी व

(३) राज्यात विविध विकास प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्त झालेले लाभार्थी

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील पठार भागात वारंवार होत असलेल्या भुकंपाबाबत

**(३१) * १३१३४७ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील पठार भागामध्ये माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान तीनवेळा भुकंप झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होवून जुन्या व जीर्ण झालेल्या घरांच्या घर मालकांना नोटीसा देण्यापलीकडे प्रशासनाने पुर्नवसनाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व या भागातील नागरीकांना कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) दि.२१.०८.२०१८ रोजी सकाळी ८.३२ वा. २.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा व दि.२४.०८.२०१८ रोजी सायंकाळी ९.१८ वा. २.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भुकंपाचा सौम्य धक्का बसला आहे.

(२) जुन्या व जिर्ण झालेल्या घरांच्या मालकांना परत भुकंप झाल्यास जिवीतहानी व वित्तहानी होउ नये म्हणुन घर दुरुस्ती करुन घेण्याकरिता नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. प्रत्यक्षात भुकंपामुळे कोणतेही नुकसान झालेले नसल्याने पुनर्वसनाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) उपविभागीय अधिकारी संगमनेर भाग संगमनेर, तहसिलदार संगमनेर व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी या भागात वेळोवेळी भेटी देउन पाहणी केली आहे.

(४) प्रत्यक्षात भुकंपामुळे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे आढळुन आले आहे. सदर घटनेच्या पार्श्वभुमीवर दि.२१.०८.२०१८ रोजी १०.३० वा. घारगाव येथे तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक व पोलीस पाटील तसेच स्थानीक लोकप्रतिनिधी यांची बैंठक आयोजित करण्यात आली. स्थानिक नागरिकांना

यापुढे भुकंपाचा धक्का जाणवला तर तात्काळ घराबाहेर पडण्याबाबत तसेच अफवांवर विश्वास न ठेवण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. प्रशिक्षित प्रशिक्षकांमार्फत विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. दि.२६.०८.२०१८ रोजी मेरी नाशिक येथील वैज्ञानिक अधिकारी श्रीमती. चा. प्र. चौधरी यांचेमार्फत सदर भागाची पाहणी करुन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. स्थानिकांना भूकंप सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत प्रशिक्षण देण्यात आले. दि.०९.१०.२०१८ रोजी यशदा, पुणे मार्फत आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली एमआयडीसीमध्ये फेज-२ असलेल्या प्रोबेस या केमिकल कंपनीत झालेल्या भीषण स्फोटातील नुकसानधारकांना भरपाई न मिळाल्याबाबत

**(३२) * १२९७४७ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली एमआयडीसीमध्ये फेज-२ असलेल्या प्रोबेस या केमीकल कंपनीत दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास झालेल्या भीषण स्फोटात अडीच हजार नागरीकांचे साडेसात कोटी रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीनंतर ही नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नागरिकांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) डोंबिवली एमआयडीसीमध्ये फेज-२ मध्ये असलेल्या प्रोबेस या केमीकल कंपनीत दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास झालेल्या भीषण स्फोटात २६६० नागरीकांचे सुमारे ७,४३,२७,९९० रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) डोंबिवली एमआयडीसीमधील प्रोबेस कंपनीत झालेल्या स्फोटाची सखोल चौकशी करणार असल्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते.
(३) मुख्यमंत्री सहायता निधीमधून सदर आपत्तीमुळे मृत्यू झालेल्या १२ व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी २ लक्ष प्रमाणे एकूण २४ लक्ष रुपये व जखमी झालेल्या २१५ व्यक्तींच्या उपचारासाठी एकूण रु. २४,५९,४९० मंजूर करण्यात आले आहेत. विषयांकित प्रकरणी स्वेच्छाधिकाराची सबब देऊन मुख्यमंत्री सचिवालयाने मदत नाकारली ही वस्तुस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या एलईडी प्रकल्प, पुणे कनेक्ट तसेच डेटा करप्ट या तीन प्रकल्पांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३३) * १३१८४२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, महानगरपालिकेच्या एलईडी प्रकल्प, पुणे कनेक्ट तसेच डेटा करप्ट या तीन प्रकल्पांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एलईडी प्रकल्प, पुणे कनेक्ट तसेच डेटा करप्ट या सर्व प्रकरणांमध्ये गैरव्यवहार झाल्याची कबुली पालिकेचे सभागृह नेते यांनी दिली असून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन पुणे महानगरपालिका आयुक्त श्री.कुणाल कुमार यांनी हे प्रकल्प हाती घेतले होते परंतु आता त्यामध्ये अनेक त्रुटी समोर आल्या असून हे प्रकल्प वादात सापडले असून यामध्ये 'पुणे कनेक्ट'च्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची संगणक खरेदी केली गेली असून डेटा ठेवण्यासाठी कंपन्यांकडून सुविधा घेण्यात आली होती पालिकेचा तो डेटा ही खराब झाला असून या प्रकल्पामध्ये ८० लाख रुपये जादा देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने 'क्लाउड रेट कॉन्ट्रक्ट'चे दर ठरवून दिले असतानाही महानगरपालिका प्रशासनाने वाढीव दराने खरेदी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • या सर्व प्रकरणांवर दि.२८.०९.२०१८ रोजी पुणे महानगरपालिकेच्या मुख्यसभेत चर्चा झालेली होती, ही वस्तुस्थिती आहे.

• दि.०२.१०.२०१८ च्या दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात अशा स्वरूपाची बातमी प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(३) व (४) • पुणे शहरात ५ कौशल्य विकास केंद्र व १६ डिजीटल लिटरसी सेंटर, पुणे महानगरपालिका आणि पुणे सिटी कनेक्ट या कंपनीमार्फत उभारण्यात आलेले आहेत.

• कौशल्य विकास केंद्राकरीता रूपये ४१.६८ लक्ष एवढ्या रकमेचे १०० लॅपटॉप खरेदी करण्यात आले आहेत. तसेच डिजीटल लिटरसी सेंटरकरीता रूपये ५२,३९,३५०/- या किंमतीचे १५० संगणक खरेदी करण्यात आले आहेत.

• पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील संगणक प्रणाली व भविष्यातील गरजेनुसार विकसित होणाऱ्या संगणक प्रणालीकरीता क्लाउड तंत्रज्ञान कार्यान्वित करण्यात आले आहे.

• या कामाकरीता सन २०१६ मध्ये निविदा प्रक्रीया राबवून सर्वात कमी दर प्राप्त झालेल्या मे. इएसडीएस सॉफ्टवेअर सोल्यूशन या निविदा धारकास ऑक्टोबर २०१६ मध्ये कार्यादेश देण्यात आले आहेत.

• पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागात एकूण ४३ सर्व्हर्स क्लाउड तंत्रज्ञानावर टप्प्याटप्प्याने कार्यान्वित असून सूस्थितीत आहेत, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• या निविदेत प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कंपनीस कामाची देयके अदा करण्यात आलेले असून ज्यादा रक्कम अदा केलेली नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• पुणे महानगरपालिकेच्या मुख्यभवन येथील सर्व्हरचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्यामुळे युपीएस बंद पडला होता. त्यामुळे सर्व्हरवरील ऑपरेटींग सिस्टीम आणि कंट्रोलचे कामकाज करणे बंद पडले होते.

• ऑपरेटर सिस्टीम व बॅकअप सर्व्हरमधून नवीन डाटाबेस कोल्ड बॅकअप त्वरीत रिस्टोर करून संगणकप्रणाली कार्यान्वित करण्यात आली. यामध्ये डाटा करप्ट झालेला नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• त्या अनुषंगाने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे (सीओईपी) यांच्या मार्फत तपासणी सुरू आहे.

(५) • पुणे महानगरपालिकेच्या एलईडी प्रकल्पाच्या संपूर्ण प्रक्रीयेची सखोल चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांना आदेश देण्यात आले आहेत.

• डाटा करप्ट तसेच क्लाउड तंत्रज्ञान सेवेबाबत उपस्थित झालेले मुद्दे व पुणे महानगरपालिकेने पाठविलेला अहवाल यात संदिग्धता असल्याने प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी व आजरा येथील पोलीस स्टेशन इमारत बांधकामास निधी मिळणेबाबत

**(३४) * १२६५९३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी व आजरा येथील पोलीस स्टेशन इमारत बांधकामास निधी मिळावा व आजरा नगरपंचायत हद्दीमध्ये असणाऱ्या पोलीस स्टेशन पासून मदरसा कॉलनीकडे जाण्याकरिता रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत मा.राज्यमंत्री गृह (ग्रामीण) वित्त व नियोजन यांचे अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गारगोटी व आजरा पोलीस स्टेशन इमारत बांधकामाकरिता येत्या अधिवेशनात निधीची तरतूद करण्याचे निर्देश मंत्रीमहोदयांनी गृहविभागाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आजरा नगरपंचायत हद्दीतील पोलीस स्टेशनपासून मदरसा कॉलनीकडे जाण्याकरिता रस्ता उपलब्ध करून देणेबाबत कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग (दक्षिण) व अतिरिक्त पोलिस अधीक्षक गडहिंग्लज यांनी संयुक्त पाहणी करून याबाबतचा अहवाल त्वरित सादर करण्याचे निर्देश विभागाला देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निर्देशानुसार शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. दिनांक ०५.०९.२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(२) पोलीस ठाणे, गारगोटी, पोलीस ठाणे, राधानगरी व पोलीस ठाणे, आजरा या इमारतीचे बांधकामाकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.
(३) पोलीस ठाणे, आजरा पासून मदरसा वसाहतीकडे जाणा-या रस्त्याची रुंदी वाढविणे, पोलीस विभागाच्या गरजा विचारात घेता, सुसाध्य होईल किंवा कसे ते तपासण्यासाठी (i) जिल्हाधिकारी, कोल्हापूर (ii) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर (iii) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, कोल्हापूर, आणि (iv) मुख्य अधिकारी, आजरा नगर परिषद, आजरा यांनी संयुक्त पाहणी करावी व शासनास अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.
(४) बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील सुवर्णदुर्ग किल्ल्याकरिता जेट्टीची सुविधा नसल्याबाबत

**(३५) * १३१७९७ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे सुवर्णदुर्ग किल्ला असून सदरचा किल्ला पाहण्याकरिता पर्यटकांची वर्दळ असते मात्र किल्ल्याकरिता जेट्टीची सुविधा नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याठिकाणी प्रवाशांना चढण्या-उतरण्याकरिता फार त्रास सहन करावा लागत असून यावेळी अपघात होण्याची शक्यता आहे तरी किल्ल्याकरिता जेट्टीची सुविधा उपलब्ध करावी याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मु.का.अ. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांना मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ठिकाणी शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) व (४) मौजे हर्णे, ता.दापोली येथे सुवर्णदुर्ग किल्ल्याकरिता जेट्टी बांधण्याच्या कामास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून दिनांक २०.०३.२०१८ रोजी रुपये ७,८२,८२,८९८/- इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे आणि त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक २३.०७.२०१८ रोजी पत्रान्वये रुपये ३,९१,४१,४४९/- इतक्या किंमतीस तत्वतः मंजूरी दिलेली असून सदर कामाची निविदा दिनांक १७.१०.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

-----------------

## मुंबईतील सुमारे ५६ हजार इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (OC) दिले नसल्याबाबत

**(३६) * १२७११७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती**

**दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुमारे ५६ हजार इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (OC) दिले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर विकासक पुढील कायदेशीर बाबी पूर्ण करत नसल्याने सदर इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र (OC) प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही अटी काही प्रमाणात शिथिल करण्यात याव्यात असे मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी शासनास पत्र पाठवून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कायदेशीर बाबी पूर्ण न करणाऱ्या विकासकांवर प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील उपलब्ध अभिलेखानुसार एकूण २२,००० इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) विकासकाने अटी व शर्तींची पूर्तता न केल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र जारी केले जात नाही.

परंतु विकासकाने बेकायदेशीर बांधकाम केले असल्यास किंवा रहिवाशी भोगवटा प्रमाणपत्राशिवाय इमारतीत रहिवास करीत असल्यास, त्यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ अन्वये कारवाई करण्यात येते.

-----------------

## मुंबईत मलेरिया, लेप्टो, डेंग्यु, स्वाईनफ्लू, गॅस्टो, हेपेटाईसीस, कॉलरा व डेंग्यु सदृष्य आजाराची लागण झाल्याबाबत

**(३७) * १२६६३६ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने नुकत्याच जाहीर केलेल्या अहवालात गत तीन महिन्यांत मुंबईत गॅस्ट्रोचे २ हजार २४४ रुग्ण आढळल्याचे तसेच ऑगस्टच्या पंधरवड्यात मलेरियाचे ४१५ रुग्ण, डेंग्यूचे ७९ रुग्ण, हेपेटायटिसचे ८१ रुग्ण तसेच लेप्टोचे ९७ रुग्ण आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डेंग्यु या आजाराने २ व लेप्टो या आजाराने ७ रुग्णांचा मृत्यु झाला आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागात सर्वात जास्त डेंग्यूचे रुग्ण आढळून आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदरील रोगांचा फैलाव होऊ नये म्हणून महानगरपालिका प्रशासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) माहे जून २०१८ ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत डेंग्युमुळे ४ व लेप्टोमुळे ११ रुग्णांचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागात जून ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत निश्चित डेंग्युचे ५ व डेंग्यु सदृश आजाराचे १९३ रुग्ण आढळून आले आहेत.

(४) साथीच्या आजारांच्या प्रतिबंधासाठी व नियंत्रणासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतातः-

• साथरोगाचे नियमित सर्वेक्षण करण्यात येते.

• किटकजन्य आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात येऊन किटकनाशक फवारणी व धुम्रफवारणी करण्यात येते.

• मलेरिया रुग्णांवर राष्ट्रीय औषध धोरणानुसार समूळ उपचार करण्यात येतात.

• जलजन्य आजारासाठी पाणी गुणवत्ता सनियंत्रण करण्यात येते.

• पदपथावरील अन्न, पाणी आणि बर्फ नमुन्यांची नियमित तपासणी करण्यात येते.

• लेप्टो प्रतिबंधासाठी उंदीर नियंत्रण व तबेल्यांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलमानुसार कारवाई करण्यात येते.

• सार्वजनिक क्षेत्रातील वैद्यकीय अधिकारी व निम्नवैद्यकीय कर्मचारी यांचे व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांना पावसाळयात उद्भवणाऱ्या आजाराचे निदान, उपचार प्रतिबंध व नियंत्रण याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

• साथरोगाच्या निदानासाठी आवश्यक प्रयोगशालेय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

• औषध व इतर साधन सामुग्रीचा आवश्यक साठा उपलब्ध आहे.

• साथरोग नियंत्रणासाठी घनकचरा व्यवस्थापन, जल विभाग, पशुसंवर्धन विभाग इत्यादी विभागाशी समन्वय तसेच, विविध जनसंपर्क माध्यमातून लोकप्रबोधन करण्यात येते.

• स्थानिक नगरसेवकांच्या सहकार्याने विभागवार आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियमित रस्तारेषा व विकास नियोजन रस्ता यामधील अडथळे दूर करून रस्ता रुंदीकरण करण्याबाबत

**(३८) * १३२५८८ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियमित रस्तारेषा व विकास नियोजन रस्ता यामधील अडथळे दूर करून रस्ता रुंदीकरण करण्याकरीता No. ch.E./DP/१९९२२/ES, दिनांक २० मार्च, २०१७ अन्वये धोरण निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणानुसार रस्त्यामध्ये असलेली बांधकामे किंवा रस्तारेषेत येत असलेली खाजगी मालकांची जागा ताब्यात घेण्याकरीता महानगरपालिका अधिनियम २९६, २९८, २९९, ३१४ व ४८८ या अन्वये नोटीस बजाविण्याचे निश्चित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभाग कार्यालयामार्फत मुंबई शहरात प्रथमच महानगरपालिका अधिनियम ३५१ अन्वये अनधिकृत बांधकामे म्हणून नोटीस बजावून रस्तारेषेतील बांधकामांना सन १९६१-६२ चे पुरावे सादर करण्यास सांगितले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र शासनाने काढलेल्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगरपालिकेने या अगोदर रस्ता रुंदीकरणातील बांधकामांना प्रकल्पग्रस्त म्हणून दिनांक १ जानेवारी, २००० च्या पुराव्यानुसार त्यांचे प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसन करून त्यांना पर्यायी जागा दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, महानगरपालिका अधिनियम ३५१ च्या नोटीसचा उपयोग रस्ता रुंदीकरणात केल्यामुळे महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या धोरणानुसार सन २००० व २०११ पर्यंतच्या घरांना असलेले संरक्षण यास बाधा पोहचून सर्व सामान्य नागरिकांवर अन्याय होणार आहे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) सदर धोरणानुसार रस्त्यामध्ये असलेली बांधकामे किंवा रस्तारेषेत येत असलेली खाजगी मालकांची जागा ताब्यात घेण्याकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २९६, २९८, २९९, ३१४ व ४८८ अन्वये नोटीस बजावण्याचे निश्चित केले आहे हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अनधिकृत बांधकामासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस देण्यात येते.

सदर नोटीस अन्वये निवासी बांधकामासाठी दिनांक १७.०४.१९६४ व अनिवासी बांधकामासाठी दिनांक ०१.०४.१९६२ चे पुरावे मागितले जातात.

तथापि, के/पूर्व विभागामार्फत रस्ता रुंदीकरणासाठी कलम ३५१ अन्वये नोटीसा देण्यात आलेल्या नाहीत.
(४) शासन निर्णयानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणातील पात्र झोपडीधारकांना प्रकल्पग्रस्त म्हणून दिनांक ०१.०१.२००० रोजीच्या पुराव्यानुसार त्यांचे पुनर्वसन करुन त्यांना पर्यायी जागा दिली आहे हे खरे आहे.
(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागामार्फत रस्ता रुंदीकरणासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस देण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील जुना बाजार येथील अमरशेख चौकातील लोखंडी होर्डींग कोसळून झालेला अपघात

**(३९) * १२६६७१ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जुना बाजार येथील अमरशेख चौकातील लोखंडी होर्डींग दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास कोसळून झालेल्या अपघातात ४ व्यक्तींचा झालेला मृत्यू व ९ व्यक्ती गंभीर जखमी झाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटूंबियांना तसेच जबर जखमी झालेल्या व्यक्तींना कोणती मदत देण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, पुणे शहरातील खडकवासला, कात्रज, बिबवेवाडी, धायरी, सिंहगड रस्ता, कोथरूड, बावधन, एरंडवणे भागात अनेक ठिकाणी धोकादायक आणि अनधिकृत होर्डिंग असल्याची बाब दिनांक ८ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात बेकायदा होर्डींग व बॅनर लावणाऱ्यांविरुध्द कारवाई करावी असे मा. उच्च न्यायालयाचे निर्देश असतानासूध्दा अद्यापही त्याचे पूर्णपणे पालन केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी पुणे शहरातील जुन्या जीर्ण झालेल्या इमारतींवर व शहरातील चौकात उभारण्यात आलेल्या होर्डींगवर व मोठ्या आकाराच्या व उंचीच्या होर्डींग लावण्यावर प्रतिबंध करण्यात येणार आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • दि.०५.१०.२०१८ रोजी शाहीर अमरशेख चौक, जुना बाजार, पुणे येथे होर्डींग कोसळून त्यात ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून १० व्यक्ती जखमी झाल्या आहेत, हे खरे आहे.

(२) • सेंट्रल रेल्वे, पुणे यांच्या हद्दीतील सदर अनधिकृत जाहिरात फलक निष्कासित करण्याची कारवाई रेल्वे प्रशासनामार्फत करण्यात येत असतांना सदर दुर्घटना घडली आहे.

• दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींपैकी ३ मृत व्यक्तींना प्रत्येकी रूपये ५ लाख, जखमी झालेल्या २ व्यक्तींना प्रत्येकी रूपये १ लाख आणि किरकोळ जखमी झालेल्या ६ व्यक्तींना प्रत्येकी रूपये ५० हजार अशी आर्थिक मदत दिली असल्याचे रेल्वे प्रशासनाने पुणे महानगरपालिकेस कळविले आहे.

• सदर प्रकरणी बंडगार्डन पोलिस स्टेशन, पुणे येथे गु.र.क्र.२८९/२०१८, भा.द.वि. कलम ३०४ (२) व ३४ अन्वये दि.०५.१०.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) • याबाबत दै.सकाळ या वृत्तपत्रामध्ये दि.०७.१०.२०१८ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती हे खरे आहे.

(४) • जाहिरात व फलक नियंत्रण नियम २००३ मधील तरतूदी तसेच मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशास अनुसरून पुणे शहरातील केलेल्या सर्व्हेक्षनांअंती दि.०१.१०.२०१८ ते दि.३१.१०.२०१८ या कालावधीत निदर्शनास आलेल्या एकूण १३४ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

• तसेच बेकायदेशीर होर्डिंग व बॅनर लावणाऱ्या विरूध्द दैनंदिन स्वरूपात निष्कासन कारवाई करण्यात येत असून संबंधीतांवर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

(५) व (६) • सद्यस्थितीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीस अनुसरून तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ च्या अनुषंगाने जाहिरात फलक, होर्डिंग व अनधिकृत होर्डिंग यांचे नियमन केले जाते.

• या नियमावलीतील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जाहिरात फलकांवर पुणे महानगरपालिकेकडून आवश्यक ती कारवाई करण्यात येते असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील असंघटीत कामगारांच्या पाल्यांना शैक्षणिक उपयोगाकरीता टॅब्लेट आणि लॅपटॉप देण्याबाबत

**(४०) * १२८४३९ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व असंघटीत कामगार माथाडी कामगार, नोंदणी झालेले सुरक्षा रक्षक, बांधकाम मजूर, घरेलू कामगार यांच्या प्रत्येकी दोन पाल्यांना टॅब्लेट आणि लॅपटॉप देण्याची घोषणा सन २०१३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी कामगार विभागाकडे रुपये १२०० कोटी जमा असताना या योजनेची अद्यापही अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांच्या इयत्ता १० वी उत्तीर्ण व त्यापुढील शिक्षण घेणा-या पाल्यास लॅपटॉप वाटप करण्याबाबतचा ठराव मंडळाच्या दिनांक २१.१०.२०१३ रोजीच्या बैठकीत पारित करण्यात आला होता.

(२) मंडळाने केलेल्या लॅपटॉप वाटपाच्या ठरावास शासनाने मान्यता दिलेली नसल्याने लॅपटॉप वाटप न करण्याचा ठराव मंडळाच्या दिनांक ३०.७.२०१४ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईतील क्रिस्टल टॉवर या बहुमजली इमारतीला लागलेल्या आगीबाबत

**(४१) * १२६४४९ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी),**

**श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील परळ येथील हिंदमाता परिसरातील 'क्रिस्टल टॉवर' या बहुमजली इमारतीला दिनांक २२ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत ४ व्यक्तींचा मृत्यु तसेच २६ जण गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील नियमांनुसार अग्निशमन यंत्रणा बसविणे बंधनकारक असून या यंत्रणांचे दर ६ महिन्यांनी ऑडीट करून त्याचा अहवाल संबंधित विभागाला सादर करणे आवश्यक आहे तसेच सोसायट्यांनी अधिकृत एजन्सीकडून फायर ऑडीट करावे असा नियम आहे व राज्यभरात अशा ५८८ परवानाधारक एजन्सी असून यापैकी २४० एजन्सी मुंबईभरात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर इमारतीमध्ये विकासकाने कोणत्याही आग प्रतिबंधक सुविधा उपलब्ध केल्या नव्हत्या यामुळे आगीचा भडका होऊन या टोलेजंग इमारतीमधील ५८ कुटुंबांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गत ६ वर्षामधील आगीमुळे २९८ जणांचा मृत्यू तर ९३४ जण जखमी झाले असून मुंबईत इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेची तपासणीच होत नाही तसेच मुंबईतील ३ हजार इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणेचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, क्रीस्टल टॉवर इमारत आग दुर्घटने प्रकरणी अग्निशमन दलाने आपला चौकशी अहवाल मा.आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ०४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास सादर केला, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या प्रकरणी विकासकाविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच मुंबईतील सर्व इमारतींचे नियमित फायर ऑडिट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) परळ येथील हिंदमाता परिसरातील “क्रिस्टल टॉवर” या बहुमजली इमारतीला दिनांक २२ ऑगस्ट, २०१८ रोजी आग लागली होती.

सदर आगीत ४ व्यक्ती मृत व २२ व्यक्ती जखमी झाल्या ही वस्तुस्थिती आहे.

(३) मुंबईतील विकास नियंत्रण नियमावली १९९१ व राष्ट्रीय इमारत संहिता नुसार उंच उत्तुंग रहिवासी इमारती, वाणिज्य इमारती, मॉल्स, मल्टिप्लेक्स, इस्पितळे इत्यादी इमारतींमध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अंतर्गत अग्निसुरक्षा उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तसेच या उपाययोजनांची वर्षातून २ वेळा (माहे जानेवारी व जुलै मध्ये) परवानाधारक अभिकरणामार्फत तपासणी करुन त्याबद्दलचे प्रमाणपत्र अग्निशमन दलास सादर करणे आवश्यक आहे.

राज्यभरात ७८७ परवानाधारक अभिकरणे असून, त्यापैकी २९४ अभिकरणे मुंबई शहर व उपनगरांमध्ये आहेत.

(४) क्रिस्टल टॉवर इमारतीचे बांधकाम करण्यापूर्वी विकासकाने आग प्रतिबंधक उपाययोजना व अग्निसुरक्षा यंत्रणा बसवून कार्यान्वित असल्याबाबतचे भोगवटा ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे तसेच, सदर

इमारतीमधील आग विझवितेवेळी अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे आढळून आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

सदर इमारतीमधील लिफ्ट लॉबीमध्ये असलेल्या इलेक्ट्रिकल केबल व इतर ज्वलनशील इंटिरियर साहित्य असल्यामुळे १२ व्या व १३ व्या मजल्याला आग लागून २९ कुटुंबांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

(५) मुंबई शहर आणि उपनगरात मागील ६ वर्षांत लागलेल्या आगीमुळे ३०० व्यक्तींचा मृत्यू व १०४५ व्यक्ती जखमी झाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

मुंबई अग्निशमन दलामार्फत महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयांत नव्याने अग्निसुरक्षा पालन कक्षाची स्थापना करण्यात आली असून, सदर कक्षामार्फत मुंबई शहरातील विविध आस्थापनांची तपासणी करुन कारवाई केली जाते.

सन २०१५ ते सप्टेंबर, २०१८ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील ५८०४ इमारतींमधील अग्निसुरक्षा उपाययोजनांची पाहणी करण्यात आली असून त्यापैकी २९४२ इमारतींच्या अग्निसुरक्षा उपाययोजनांमध्ये त्रुटी असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

सदर २९४२ इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये नोटीस बजावून त्यांना ठराविक मुदतीमध्ये त्रुटींची पुर्तता करण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आले.

सदर इमारतींपैकी २९२४ इमारतींनी त्यांना दिलेल्या मुदतीत अग्निसुरक्षा उपाययोजनांच्या त्रुटींची पुर्तता केली आहे.

ज्या १८ इमारतींनी त्रुटींची पुर्तता केली नाही त्या इमारतींविरोधात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खटले दाखल करण्यात आले आहेत.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने क्रिस्टल टॉवर इमारत दुर्घटनेप्रकरणीचा चौकशी अहवाल संबंधित एफ/दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त व इमारत प्रस्ताव (शहर) यांना दिनांक ०४ सप्टेंबर, २०१८ रोजी सादर केला आहे.

(७) सदर प्रकरणी विकासकाविरुध्द भोईवाडा पोलीस ठाणे येथे दिनांक २२.०८.२०१८ रोजी गुन्हा नोंद क्रमांक १७५/२०१८, कलम ३०४, ३३८, ३३७,

३३६ भा.दं.वि. सह ३(३), ३६ महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीवसंरक्षण अधिनियम २००६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये वर्षातून २ वेळा मुंबई शहर व उपनगरांमधील २९४ परावानाधारक अभिकरणामार्फत तपासणी करुन त्याबद्दलचे प्रमाणपत्र संबंधित मालक/ भोगवटादार यांनी अग्निशमन दलास सादर करणे आवश्यक आहे.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीतील प्रीमियम टूल कंपनीने कर्मचा-यांचे वेतन थकविल्याबाबत

**(४२) * १२९११७ श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीतील प्रीमियम टूल कंपनी येथे कायमस्वरूपी कार्यरत असलेल्या १११ कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी २०१८ पासूनचे थकीत वेतन मिळण्यासाठी सी.आय.टी.यू. संघटना, नाशिक यांनी मा. कामगार आयुक्त, नाशिक यांना दिनांक ९ ऑगस्ट,२०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने मागील २० महिन्यांपासून कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम, सोसायटी आणि एलआयसीचे हप्ते देखील भरले नसून मागील ६ महिन्यांत ३६ बैठका घेऊन देखील तोडगा न निघाल्याने कर्मचार्यांना उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सी.आय.टी.यु संघटनेच्या निवेदनानुसार कर्मचाऱ्यांना थकीत वेतन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय. हे खरे आहे.

तथापि, नाशिक वर्कर्स युनियन (सी.आय.टी.यु.संलग्न), नाशिक या संघटनेने कामगार उप आयुक्त कार्यालय, नाशिक यांना यासंदर्भात दिनांक २१.१२.२०१७ रोजी निवेदन दिले आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) कंपनीने माहे एप्रिल, २०१८ पासूनचे कामगारांचे वेतन अदा केले नसल्याने कंपनी व्यवस्थापनाविरोधात वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत दिनांक ६.८.२०१८ रोजी खटला क्रमांक ४५७५/२०१८ दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील गैरव्यवहाराबाबत

**(४३) * १२९८९४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत साहित्य खरेदी अनुदानासाठीचे अर्ज माहे जून व जुलै, २०१७ पासून सादर केले असूनही बांधकाम कामगारांना अनुदान न मिळाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, व जुलै, २०१७ नंतर बांधकामाचे साहित्य खरेदी अनुदानाकरीता अर्ज केलेल्या लाभार्थ्यांना अनुदान मिळाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम कामगारांच्या योजनेसाठी शासनाने मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली असतांना हेतुपुरस्सरपणे प्रशासकीय दिरंगाईमुळे कामगार लाभापासून वंचित राहत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहाय्यक कामगार आयुक्त, अमरावती या कार्यालयातील काही कर्मचारी जे नोंदणीकृत लाभार्थी पैसे देतात त्यांचेच काम करत असून इतर कामगारांना उद्धट वागणूक देत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारासच्या पत्रान्वये लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून संबंधित कार्यालयात गैरप्रकार व गैरव्यवहार करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, अमरावती कार्यालय येथे साहित्य खरेदी अनुदानाकरिता सप्टेंबर, २०१८ अखेर एकूण २६२१३ अर्ज प्राप्त झाले. सदर अर्जांची पडताळणी करुन ९१८८ पात्र बांधकाम कामगारांच्या बँक खात्यामध्ये प्रत्येकी रु.५०००/- प्रमाणे एकूण रु.४,५९,४०,०००/- जमा करण्यात आले आहेत. उर्वरित अर्जांची पडताळणी करण्यात येत असून पात्र ठरणाऱ्या बांधकाम कामगारांना लाभाची रक्कम अदा करण्यात येणार आहे.
(२) हे खरे नाही.

जुन व जुलै, २०१७ नंतर साहित्य खरेदी अनुदानाकरिता अर्ज केलेल्या कामगारांच्या अर्जांची पडताळणी करण्यात येत असून, पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या कामगारांना अनुदानाची रक्कम अदा करण्यात येईल.
(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, अमरावती कार्यालय येथे उपलब्ध असलेल्या कर्मचारी, अधिकारी यांचेमार्फत बांधकाम कामगारांना लाभ देण्याचे काम पार पाडले जात आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील माहूल-चेंबूर येथील बीपीसीएलच्या रिफायनरीमधील हायड्रोकार्बन युनिटमधील बॉयलरचा झालेला स्फोट

**(४४) * १२६४४३ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ**

**(बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहूल-चेंबूर येथील बीपीसीएलच्या रिफायनरीमधील हायड्रोकार्बन युनिटमधील बॉयलरचा भीषण स्फोट दिनांक ८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटात किती व्यक्ती मृत व जखमी झाले आहेत,

(३) असल्यास, सदर स्फोटामुळे शेजारील माहुलगांव, गवाणपाडा, कॅलिको इ. गावात धुर पसरुन घबराटीचे वातावरण निर्माण झाले असुन कंपनीच्या परिसरातील नागरीकांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईत सन १९९२ मध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर पेट्रोकेमिकल्स कंपन्यांच्या सुरक्षितेचे ऑडिट करण्यात आलेल्या सल्लागारांनी दुर्घटना झाल्यानंतर प्रतिबंधात्मक उपाय करण्याऐवजी दुर्घटना होऊ नये म्हणून संपूर्ण यंत्रणेची देखभाल ठेवणे आवश्यक असल्याची शिफारस केली होती या शिफारशीनुसार कंपनी व्यवस्थापनाने कोणतीच पावले उचलली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हा स्फोट होण्याची कारणे काय आहेत याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणातील संबंधीत दोषींवर कारवाई तसेच मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटंबांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे,

मुंबईतील माहूल-चेंबूर येथे बीपीसीएलच्या रिफायनरीमधील हायड्रोकार्बन प्लांटमध्ये दिनांक ०८.०८.२०१८ रोजी इफ्ल्युंट कुलरमधील दाबयुक्त अतिज्वालाग्रही वायुची गळती झाल्याने सदर वायु वातावरणात मिसळला व त्याचा स्फोट होवून आग लागण्याची घटना घडली.

(२) सदर स्फोटात ४१ कामगार जखमी झाले होते. स्फोटातील जखमी कामगारांवर तात्काळ कारखान्याच्या प्रथमोपचार केंद्रात उपचार करण्यात आले. त्यापैकी १९ कामगारांना त्याचदिवशी घरी सोडण्यात आले व उर्वरित २२ कामगारांना खाजगी दवाखान्यात दाखल करुन उपचारानंतर घरी सोडण्यात आले. यापैकी ३७ कामगार कामावर रुजू झाले आहेत व चार कामगारांवर घरी उपचार सुरु आहेत. सदर घटनेत कोणासही अपंगत्व आलेले नाही वा कोणीही मृत पावले नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

पोलीस उप आयुक्त कार्यालय, चेंबुर, मुंबई यांनी दिनांक ०२.११.२०१८ च्या पत्रान्वये सदर स्फोटामुळे माहुलगाव चेंबूर परिसरातील रहिवासी लोकांच्या राहत्या घरांना, इमारतींना तडा गेल्याबाबतची माहिती उपलब्ध होते असे कळविले आहे. परंतु, राहत्या घरांचे नुकसान झाल्याबाबत आर.सी.एफ पोलीस ठाण्यास कोणत्याही प्रकारची तक्रार दाखल झाली नसल्याचे देखील कळविले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आलेली आहे. सदर कारखान्यातील इफ्ल्युंट कुलरमधील फ्लोटींग हेडरचे वेल्डिंग तुटल्यामुळे तेथून दाबयुक्त अतिज्वालाग्राही वायुची गळती

झाल्याने सदर वायु वातावरणात मिसळला व त्याचा स्फोट होवून आग लागण्याची घटना घडली. सदर घटनेमध्ये कारखान्यातील काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याला धोका पोहचू नये याकरीता कारखान्यातील सयंत्रे सुस्थितीत न ठेवल्यामुळे कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ७ A (२) (a) चा भंग झाल्याचे आढळून आल्याने कारखान्याचे भोगवटादार यांचेविरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, दादर, मुंबई यांचे न्यायालयात खटला क्र.२९०२९१४/२०१८ दाखल करण्यात आला आहे.

सदर स्फोटामध्ये ४१ कामगार जखमी झाले असून सदर घटनेत कोणासही अपंगत्व आलेले नाही वा कोणीही मृत पावलेले नाही. त्यामुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर स्फोटामध्ये जखमी झालेल्या एकूण ४१ कामगारांच्या उपचाराचा खर्च कारखाने व्यवस्थापनाने केला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारघर (नवी मुंबई) येथील सिडकोतर्फे कोयना पुरग्रस्तांना वाटप केलेली जमीन बेकायदा हस्तांतरण करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(४५) * १२६४३० श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खारघर जवळील सिडकोतर्फे कोयना पुरग्रस्तांना वाटप केलेली जमीन बेकायदा हस्तांतरण करुन गैरव्यवहार केल्याचे प्रकरण तसेच सिडकोतर्फे गत १५ वर्षात कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेले सर्व भूखंड आणि भूखंड हस्तांतरणाआधी सर्व प्रकरणांची चौकशी करण्यासाठी शासनाने मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री.किशोर रोही यांची दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना पुरग्रस्तांना सिडकोतर्फे जमीन वाटप केल्याची एकूण किती प्रकरणे आहेत तसेच माहे ऑक्टोबर, २०१८ पर्यंत एकूण किती प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे व या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन किती कालावधीत शासनास अहवाल सादर करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, जमीन वितरण अनियमिततेबाबत चौकशी समितीकडून अद्यापपर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनास अहवाल सादर करण्यात आला आहे काय व त्यानुषंगाने शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मौजे ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.१८३ मधील नवी मुंबई प्रकल्पासाठी अधिसूचीत केलेल्या तथापि, संपादित न झालेल्या जमीन हस्तांतरणाची चौकशी करण्याकरीता श्री.किशोर जे. रोही, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची दि.२०.८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, श्री.किशोर जे. रोही यांनी वैद्यकीय कारणास्तव सदरहू जबाबदारी स्विकारण्यास असमर्थता दर्शविली असल्याने त्यांची नियुक्ती रद्द करुन (दि.२०.०८.२०१८ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन) त्यांच्याऐवजी श्री.आर.सी. चव्हाण, सेवानिवृत्त न्यायमूर्ती, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची दि.०३.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर एकसदस्यीय समितीच्या कार्यकक्षेनुसार सिडको अधिसूचीत क्षेत्रातील कोयना प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या मौजे ओवे येथील सर्व्हे क्र.१८३ मधील जमिनींच्या व्यवहाराची तसेच गत १५ वर्षामध्ये या स्वरुपाचे व्यवहार झालेल्या कोयना प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करण्यात आलेल्या अन्य प्रकरणांची चौकशी करुन ३ महिन्यात अहवाल सादर करणे आवश्यक आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील बेरोजगारांची फसवणूक होत असल्याबाबत

**(४६) * १३२५६४ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील बेरोजगारांची फसवणूक होत असतानाही कार्यवाही न करता दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्यास विलंब होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरून एका आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन, भंडारा येथे अपराध क्रमांक ५२१/१८ भादंवि कलम १७०, ४१९, ४२०, ४६५, ४७०, ४७३ सहकलम ६६(ड) माहीती तंत्रज्ञान अधिनियम सन २००८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील इंदिरा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकारी गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नेमण्याबाबत

**(४७) * १२६४३४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी (मुंबई) येथील इंदिरा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकारी संस्थेच्या कारभाराविरुद्ध श्री. प्रवीण दळवी व इतर यांनी सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दाद मागितली असता तत्कालीन सहाय्यक निबंधक, श्री प्रताप पाटील यांनी सदरहू संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या १७८ सभासदांचे सभासदस्यत्व बदली करताना कायद्याने उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि सहाय्यक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांची परवानगी आवश्यक असतानाही ती घेतली नसल्याबाबत तसेच या सभासदांकडून M.C.A. Act

च्या कलम १०१ नुसार दंडात्मक रक्कम वसूल न केल्याबाबत ठपका ठेवत M.C.A. Act च्या कलम ७८ अन्वये दिनांक १९ मार्च, २०१२ रोजी वा त्या सुमारास सदरहू संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना पदावरून हटविण्यासंदर्भात विविध कारणांचे दाखले देत "कारणे दाखवा" नोटीस बजावली असून देखील अद्यापपर्यंत सदरहू गृहनिर्माण संस्था बरखास्त झाली नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निवेदनाद्वारे सहाय्यक निबंधक, मुंबई शहर, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण भवन यांच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, सदरहू चौकशीत काय आढळून आले आहे आणि इंदिरा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या कारभारास आळा घालण्यासाठी कारणे दाखवा नोटीसीच्या अन्वये संस्था बरखास्त करण्याबाबतच्या प्रकरणावर तातडीने निर्णय होण्याकरिता आणि दरम्यानच्या काळात सदरहू संस्थेवर प्रशासक नेमण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर यांनी दि.१२/१०/२०१२ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. सदरच्या आदेशा विरूध्द श्री.भागोजी अप्पा नितवडेकर व इतर यांनी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांचे कडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५२ अपिल दाखल केले होते. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर, यांचे आदेश रद्द करून फेर सुनावणी घेणेबाबत आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाविरूध्द संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५४ अन्वये मा.मंत्री (सहकार) याचे समोर पुर्ननिरिक्षण अर्ज करण्यात आला होता. सदर पुर्ननिरिक्षण अर्जावर सुनावणी

घेऊन दि.२९/०४/२०१५ च्या आदेशान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, यांचे दि.१०/०५/२०१३ रोजीचे आदेश कायम करण्यात आले. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं.३०१६/२०१४ अन्य याचिका दाखल केलेल्या असून मा.उच्च न्यायालय यांनी जैसे थे परिस्थिती (status-quo) ठेवण्याबाबत आदेशीत केलेले आहे.

-----------------

## नवी मुंबईत सिडको निर्मित कंडोमिनियम अंतर्गतची विकासकामे करण्यास परवानगी मिळणेबाबत

**(४८) * १२६४१६ श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत सिडको निर्मित कंडोमिनियम अंतर्गतची गटारे, नाले, मलनिःसारण, रस्ते, दिवे इत्यादी कामे करण्यास शासनाने नवी मुंबई महानगरपालिकेस बंदी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंडोमिनियमअंतर्गत सदरची कामे होत नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून वारंवार मलेरिया, डेंगू इत्यादी आजाराने नागरिक त्रस्त झाले आहेत याची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, नाशिक, औरंगाबाद महानगरपालिकेला कामे करण्यास परवानी दिली आहे त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेस कामे करण्यास घातलेली बंदी उठवावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, नगरविकास विभाग-२, यांना माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शसनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कंडोमिनियम अंतर्गतची कामे करण्यास विशेष बाब म्हणून मंजूरी मिळणेबाबतच्या महानगरपालिकेच्या प्रस्तावास मान्यता देणे उचित होणार नसल्याचे यापूर्वी दि. २९.०५.२०१५ च्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

(२) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मलेरीया, डेंग्यू नियंत्रणाकरीता नियमित उपाययोजना केल्या जातात.

• या क्षेत्रात नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला अशी वस्तुस्थिती नाही, असे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(४) • दि. २६.०२.२००१ च्या शासन परिपत्रकान्वये नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाच्या कामासंदर्भात मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत.

• नगरसेवक स्वेच्छा निधीतून प्रामुख्याने सार्वजनिक स्वरूपाची कामे घेण्यात येतात. कंडोमिनियम सारख्या खाजगी संस्थांची/सहकारी संस्थांची / वैयक्तिक लाभधारकांची कामे सदर मार्गदर्शक तत्वात बसत नाहीत.त्यामुळे अशा कामांना परवानगी देणे संयुक्तिक नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून ई-कचऱ्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(४९) * १२७३६२ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरात निर्माण होणारा हजारो टन ई-कचऱ्याचे वर्गीकरण करुन आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक अशा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत महानगरपालिका प्रशासनाकडे योग्य त्या उपाययोजना नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणेकरांची बदलती जीवनशैली, औद्योगिकरण व झपाट्याने बदलत असलेले तंत्रज्ञान यामुळे पुणे शहरात सध्या एका वर्षात १० हजार

मेट्रिक टन ई- कचरा जमा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या पर्यावरण अहवालामध्ये शहरात विविध नऊ ठिकाणी ई- कचरा कलेक्शन सेंटर सुरु केल्याचे नमूद केले होते परंतु यापैकी कोणत्याही ठिकाणी या प्रकारची सुविधा उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • या प्रकरणी दि.०१.०८.२०१८ च्या दै.लोकमत या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

• पुणे शहरात दररोज सुमारे ५ मे.टन ई-कचऱ्याची निर्मिती होते ही वस्तुस्थिती आहे.

• पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण अहवालामध्ये शहरात ९ ठिकाणी ई-कचरा कलेक्शन सेंटर सुरू केले असल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे. सदरची व्यवस्था नागरीकांच्या सोयींसाठी विविध शाळा, सोसायटी, सार्वजनिक ठिकाणे व कार्यालये या ठिकाणी सदरचे सेंटर कार्यरत आहेत असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच कमिन्स इंडिया प्रा.लि. यांच्या सिएसआर फंडातून कोथरूड येथे १ ई-कचरा संकलन केंद्र पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आले आहे.

• कोथरूड डेपो व धनकवडी येथे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने अधिकृत केलेले पुणे महानगरपालिकेचे ई-कचरा संकलन केंद्र दैनंदिन स्वरूपात स्वच्छ संस्थेमार्फत कार्यरत आहे.

• याच धर्तीवर भविष्यात ५ संकलन केंद्रे उभारण्याचे नियोजन आहे.

• तसेच पुणे शहरात आरोग्य विभागाच्या १७७ कोठ्यांमध्ये पहिल्या व तिसऱ्या शनिवारी सकाळी ८.०० ते ११.०० या वेळेत ई-कचरा संकलन केले जाते.

• स्वच्छ अभियान अंतर्गत प्रत्येक कोठीवर सकाळी ८.०० ते ११.०० या वेळेमध्ये ई-कचरा आणि प्लॅस्टिक संकलन चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील चोवीस तास पाणी पुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५०) * १२७८९५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात २४ तास पाणीपुरवठ्याचा दावा करून महानगरपालिकेने योजना सुरू केली व या योजनेवर ३०७ कोटी ४३ लाखांचा निधी खर्च करण्यात आला परंतु शहरात अनेक भागांत अद्यापही पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राबवितांना ऑरेंज सिटी वॉटर वर्क्सने विविध भागात पाणी वितरणाची सोय केली तरीसुध्दा शहरातील अनेक भागात आजही टॅकरने पाणी पुरवठा केला जात असून या टॅंकर पुरवठयामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार सुरु असून वर्धमान नगर परिसरातील माहेश्वरी अपार्टमेंमध्ये गत साडेतीन महिन्यात १५७ टॅंकरने पाणी पुरवठा केल्याचे कागदोपत्री दाखवून शासनाची फसवणूक करण्यात आल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात सुरू असलेल्या “चोवीस बाय सात” तास पाणी पुरवठा योजनेत झालेल्या गैरप्रकाराबाबत लोकप्रतिनिधींनी सभागृहात केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने ८० हजार ग्राहकांची यादी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास यांना दिनांक ५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, योजनेला पुरेसा निधी मिळूनही टाक्यांचे बांधकाम प्रलंबित असून पाणीपुरवठाही ठप्प झाला आहे तसेच २० पैकी ७ टक्यांची डागडुजीसुध्दा प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीचा तपशिल काय आहे, चौकशीनूसार संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरातील राबविण्यात येत असलेल्या २४ तास पाणीपुरवठा योजनेवर महानगरपालिकेने आतापर्यंत रु.३०७.४३ कोटी इतका खर्च केला आहे, हे खरे असून, या योजनेचे आतापर्यंत ७७.३५ टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) हे खरे नाही.

करारातील अटी व शर्तीनुसार शहरातील ज्या भागात पाईप लाईनचे जाळे आहे परंतु कांही कारणास्तव पाणीपुरवठा होत नाही किंवा अनियमित पाणी पुरवठा होतो, अशाच भागात ऑपरेटरने विनामूल्य टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करायचा आहे.

त्यानुसार, ऑपरेटरने वर्धमान नगर या उंचीवरील भागात पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे याठिकाणी टँकरने विनामूल्य पाणीपुरवठा प्रत्यक्षरित्या केलेला आहे. यासाठी महानगरपालिकेने कोणतीही रक्कम अदा केलेली नाही.
(३) होय असे निवेदन प्राप्त झाले असून, या निवेदनात केलेल्या विनंतीनुसार मा.विधानसभा सदस्यांना दिनांक ०३/११/२०१८ रोजी ८५,७३० ग्राहकांची यादी घरपोहोच करण्यात आल्याचे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(४), (५) व (६) या योजनेतंर्गत पूर्ण करावयाच्या नवीन २४ पाण्याच्या टाक्यांपैकी २० टाक्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, येथून पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे. तर उर्वरित ०४ टाक्यांपैकी ०३ टाक्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, अनुषंगिक कामे लवकरच पूर्ण होत आहेत. तर उर्वरित ०१ टाकीचे काम प्रगतीपथावर आहे.

जुन्या २० टाक्या सध्या वापरात असून त्यांच्या दुरुस्ती व सुदृढीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात येत आहे. त्याअंतर्गत १३ टाक्यांची दुरुस्ती व सुदृढीकरण पूर्ण झाले असून, ०२ टाक्यांची दुरुस्ती व सुदृढीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित ०५ टाक्यांच्या दुरुस्तीचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे आणि या योजनेतील प्रलंबित इतर सर्व कामे मार्च, २०१९ अखेर पूर्ण करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेने नियोजन केले असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

-----------------

## बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य व भांडारपाल यांनी शालेय साहित्य खरेदीत केलेला अपहार

**(५१) * १२८१९८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य व भांडारपाल यांनी दिनांक २६ फेब्रुवारी ते ३ मार्च २०१८ या कालावधीत शालेय साहित्य खरेदीच्या बनावट पावत्या देऊन अपहार केल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शहर पोलीस स्टेशन खामगाव (जि.बुलढाणा) येथे संबंधितांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा सुद्धा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काही निष्पन्न झाले व तद्नुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था बुलढाणा येथील साहित्य खरेदी प्रकरणात पैशाचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य व भांडारपाल यांनी दिनांक २६ फेब्रुवारी ते ३ मार्च २०१८ या

कालावधीत शालेय साहित्य खरेदीच्या बनावट पावत्या देऊन अपहार केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा/केंद्र, बुलढाणा या संस्थेमध्ये सदर बाब निर्दशनास आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याप्रकरणी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांचे स्तरावर प्राथमिक चौकशी समिती गठीत केली होती. सदर चौकशी समितीने दिलेल्या अहवालानुसार संबंधित दोषीवर एफआयआर (FIR) दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याचे सामाजिक न्याय मंत्री यांच्या स्वीय सहाय्यकांना मंत्रालयातील दालनात केलेली मारहाण

**(५२) * १२७३७७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे सामाजिक न्याय मंत्री यांच्या स्वीय सहाय्यकाने एका संस्थाचालकांकडून त्यांचे काम करुन देण्यासाठी १० लाख रुपये घेऊन त्यांचे काम न केल्यामुळे मा.मंत्री महोदयांच्या स्वीय सहाय्यकांना दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंत्रालय येथील मा.मंत्री यांच्या दालनात मारहाण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्‌नूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट नगरपरिषद (जि.वर्धा) येथील रोजंदारी कर्मचा-यांना विशेष बाब म्हाणून नगरपंचायत सेवेत कायम करण्याबाबत

**(५३) * १३२५५४ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट)** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट नगरपरिषद (जि.वर्धा) येथील रोजंदारीवर कार्यरत असणाऱ्या २७२ कर्मचा-यांना नगरपरिषदेच्या सेवेत विशेष बाब म्हणून कायम करण्याबाबत तसेच जिल्ह्यातील नवनिर्मित नगर पंचायतीमध्ये समायोजन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना वारंवार निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) हिंगणघाट नगरपरिषद (जि.वर्धा) येथील रोजंदारीवर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नियमित सेवेत समावेशनाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे.

(२) • हिंगणघाट नगरपरिषदेमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या समावेशनासंदर्भात वरिष्ठ स्तरावर बैठक घेण्यात आली आहे.

• तदनुषंगाने, हिंगणघाट नगरपरिषदेमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या नियमित सेवेत समावेशनाबाबत नगरपरिषद हिंगणघाट यांचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत तपासण्यात येत आहे.

• नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शासन स्तरावर सत्वर नियमोचीत कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय विभागात नोकरीच्या आमिषाने तरुणांची केलेली फसवणूक

**(५४) * १२७६५६ श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये पैसे घेऊन शासकीय वैद्यकीय विभागात नोकरीच्या आमिषाने सुमारे चाळीस तरुणांची फसवणूक करणाऱ्या सहा जणांच्या टोळीला अटक करण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टोळीने आतापर्यंत सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक केल्याची माहिती देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा सखोल तपास करून सदरहू प्रकरणातील संबंधीत सर्व दोषींविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, राज्यात असे एकाच नव्हे तर अनेक ठिकाणी अशी फसवणूक केली जात असून काही सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी यांची मदत घेऊनच अगदी हुबेहूब शासकीय नोटीस सारखे बनावट कागदपत्र व स्टॅम्प बनवून लोकांची फसवणुक होत असल्याने यावर प्रतिबंधक उपाय म्हणून शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी शिरोली पोलीस स्टेशन गु.र.नं. १८१/२०१८ मध्ये १६ लाख रुपयाची, राजारामपुरी पोलीस स्टेशन गु.र.नं. २९६/२०१८ मध्ये १ कोटी ४ लाख रुपयाची, शिरोळ पोलीस स्टेशन गु.र.नं. १२३/२०१८ मध्ये ४९,३०,३००/- रुपयाची व कोडोली पोलीस स्टेशन गु.र.नं.१२२/२०१८ मध्ये २३,५०,०००/- रुपयाची फसवणूक केले प्रकरणी कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

शिरोळ पोलीस स्टेशन गु.र.नं. १२३/२०१८ मध्ये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून इतर ३ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(४) तसेच सरकारी नोकरीचे अमिष दाखवून फसवणूक केले प्रकरणी एन. आर.आय. पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गु.र.नं. १५६/२०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरकारी नोटीस सारखे खोटे कागदपत्र व स्टँप बनवून लोकांची फसवणुकीबाबत पोलीस विभागास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणुन कायदेशीर तरतुदीनुसार कारवाई करण्याकरीता परिपत्र क्र. पोमसं/२२/गैरवापर नावं व मुद्रा/०७/२०१८, दि.१३/११/२०१८ नुसार सर्व पोलीस घटकांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पाबाबत

**(५५) * १३१३४२ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बसवराज पाटील (औसा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरु होऊन एक वर्ष उलटून गेले असले तरीही पुनर्वसन प्रकल्पाबाबतची प्रक्रिया अदयापही सुरु न झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी पसरली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाने संक्रमण शिबिरांची यादी लावल्यानंतर संक्रमण शिबिरासाठीचा करार नोंदणीकृत असावा, पुनर्वसन प्रकल्पातील सदनिकेचाही नोंदणी करार तसेच देखभाल दुरुस्तीचा निधी जाहीर करावा अशा मागण्या रहिवाशांकडून केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत म्हाडाने कार्यवाही करुन पुनर्वसन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील कामकाज प्रगतीपथावर आहे. प्रकल्पासाठी आवश्यक सर्व मंजूरी/परवानगी प्राप्त झाल्या आहेत. वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासांठी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(२) संक्रमण गाळयासाठीचा करार पंजीकृत असावा व पुनर्वसन सदनिकेचा करार पंजीकृत करावा अशी मागणी रहिवाशांनी केलेली आहे. परंतु, देखभाल दुरुस्तीचा निधी जाहीर करावा, अशी मागणी रहिवाशांनी केलेली नाही, असा म्हाडाचा अहवाल आहे.

(३) बीडीडी चाळीतील गाळा रिक्त करण्यापूर्वी संक्रमण शिबीराबाबत चाळ कायदेशीर करार पंजीकृत करण्यात यावा ही रहिवाशांची मागणी मान्य करण्यात आली आहे. तसेच पुनर्वसन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुनर्वसन सदनिकेचा कायदेशीर करारनामा लाभार्थ्यासोबत पंजीकृत करण्यात येईल असे रहिवाशांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समतानगर, कांदिवली येथील ५३ एकरचा म्हाडाच्या मालकीचा भुखंड मे.एस.डी. कार्पोरेशन या विकासकाने तारण ठेवल्याबाबत

**(५६) * १३०१४५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समतानगर, कांदिवली येथील ५३ एकरचा म्हाडाच्या मालकीचा भुखंड मे. एस.डी. कार्पोरेशन या विकासकाने तारण ठेवून एक हजार कोटीचे कर्ज बँकेकडून घेतल्याची बाब नुकतीच निदर्शनास आल्याने या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री तसेच अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना

या संदर्भात चौकशी करण्याबाबत पत्रव्यवहार केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विकासकाने एकत्रित पुनर्विकासास फक्त ४७ सोसायट्यांची संमती असतांना बनावट कागदपत्रांच्या आधारे संपुर्ण ८० सोसायट्यांची संमती असल्याचे दाखवून शासनाची व रहिवाश्यांची फसवणूक केलेली आहे तसेच विक्री घटकातील सदनिकांची विक्री करुन कोट्यवधीचा नफा विकासक कमवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्प विकासकाकडून काढून घेवून या ठिकाणी म्हाडा स्वत: पुनर्विकास करणार आहे काय व या प्रकल्पास स्थगिती देण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) या अनुषंगाने श्री. धनंजय मुंडे, मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद यांचे दि.०६.०९.२०१८ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.
(२) सदर प्रकल्पाचे विकासक मे. एस. डी. कॉर्पोरेशन यांच्या पुनर्निरिक्षण अर्जाच्या अनुषंगाने सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम क्र.१५४ अन्वये तत्कालीन मा. मंत्री सहकार,महाराष्ट्र शासन यांनी दि.१२.११.२०१३ रोजी एकूण ६३ संस्थांची अर्जदार मे. एस. डी. कॉर्पोरेशन यांच्या नेमणूकीस संमती असल्याची वस्तुस्थिती कायम करण्यात येत आहे, असे आदेश पारीत केलेले आहेत. त्यानुसार म्हाडाने समतानगर युनियनमार्फत सुरु असलेल्या पुनर्विकासास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात आल्याचे म्हाडाने कळविलेले आहे. डिसेंबर, २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सुचना क्र.४०० वरील चर्चेच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदर प्रकरण मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली शिखर तक्रार निवारण समितीकडे सोपविले होते. मात्र सदर समितीच्या कार्यकक्षेबाबत सेंट्रल बँक ऑफ इंडीयाने मुद्दा उपस्थित केल्याने त्या समितीने सदर प्रकरण मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समिती / म्हाडा यांच्याकडे चौकशी करीता सोपविले. उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, उच्च स्तरीतय समिती/म्हाडा यांनी या प्रकरणी सुनावणी घेऊन दि.१४.०९.२०१८ रोजी आदेश पारित केले आहेत व त्यामध्ये अंतिमत:

खालीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत :-

"In view of the aforesaid facts of the case and the judgments as enumerated herein above this committee does not find any infirmity in the permission granted by MHADA for integrated redevelopment of entire Samta Nagar Layout including Economic Weaker Section (EWS), Lower Income group (LIG), Middle Income group (MIG), Higher Income group (HIG) and open spaces, various reservations and etc. dully sanctioned by State Govt."

(३) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (५) मधील तरतूदी आणि प्राधिकरणाचे ठराव व धोरणाच्या अधीन राहून तसेच मा.सहकार मंत्री यांच्या दि.१२.११.२०१३ रोजीच्या आदेशानुसार समतानगर को. ऑ. हौ. सो. युनियन मध्ये समाविष्ट असलेल्या ६३ अत्यल्प/अल्प/मध्यम उत्पन्न गटांतर्गत असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंडळातर्फे देकारपत्र / नाहरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे.

म्हाडाकडून प्राप्त अहवालानुसार म्हाडा स्वत: पुनर्विकास करणार नसून, सदर पुनर्विकास प्रकल्प विकासकामार्फत राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोअर परेल गणपतराव कदम मार्ग येथील केळीच्या चाळीची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(५७) * १२६७८५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परेल (मुंबई) गणपतराव कदम मार्ग येथील सन १९९३ साली भूसंपादन करून म्हाडाने ताब्यात घेतलेल्या सीएस क्र. २५५ ज्या भूखंडावरील केळीच्या चाळीची डी.सी. रुल ३३ (७) व ३३ (९) अन्वये म्हाडातर्फे मार्गदर्शिका ठरली नसल्यामुळे दोन वेळा दोन विकासकांना दिलेली पुनर्विकासाची परवानगी रद्द झाल्याने सदरहू इमारतीची ५० वर्षात अद्यापर्यंत पुनर्बांधणी होऊ शकली नसल्याची बाब दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळीच्या चाळीची पुनर्बांधणी न झाल्याने ५० वर्षापासून संक्रमण शिबिरात असलेल्या भाडेकरूंना विकासकाने भाडे देणे बंद केले असून वीज-पाणी बंद करण्याचे धमकाविण्यात येऊन नाहक त्रास देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त चाळीची पुनर्बांधणी म्हाडातर्फे सुमारे ५० वर्षे रखडण्याची व त्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर इमारतीची पुनर्बांधणीची कार्यवाही शासनाने तातडीने सुरू करून वेळेत बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने केलेल्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही. केळीची चाळ या इमारतीच्या पुनर्विकासाठी सद्यस्थितीत कोणताही विकासक न नेमल्यामुळे विकासकाने भाडे देणे बंद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) सद्यस्थितीत म्हाडाच्या भुसंपादित मालमत्तांच्या पुनर्विकासाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या न्यायालयीन प्रकरणी अशा भूसंपादित मालमत्तेबाबतच्या पुनर्विकासाची भूमिका म्हाडाने मा.उच्च न्यायालयात शपथपत्राद्वारे सादर केलेली आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार म्हाडाकडून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## देसाईगंज वडसा नगरपरिषदेच्या (जि.गडचिरोली) विद्युत पोल उभारणी व त्यावर फिलिप्स कंपनीचे दिवे लावण्याच्या कामात झालेली अनियमितता

**(५८) * १२७४४७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देसाईगंज वडसा नगरपरिषदेच्या (जि.गडचिरोली) विद्युत पोल उभारणे व

त्यावर फिलिस्प कंपनीचे दिवे लावण्याच्या कामात अनियमितता केल्याबद्दल दोषी असलेल्या सर्व संबधितांवर फौजदारी कारवाई करण्याबाबत लेखी निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई आणि जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त (महसूल), नागपूर यांनी चौकशी करुन संबधित दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात यावी असा शिफारस असलेला अहवाल प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे नपाक्र.१९(२) कावि-७९/१८ दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ ला पाठविलेले असतांनासुध्दा अघापही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागीय आयुक्त (महसूल), नागपूर यांनी चौकशी करुन संबंधित दोषींवर फौजदारी कारवाई करण्यात यावी असे पत्र व चौकशी अहवाल जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे स्वीस/कावि (१९/२०१८) दिनांक २३/२/२०१८ ला पाठविलेले असतांनासुध्दा संबंधितांवर अघापही फौजदारी कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने आणि आयुक्त, नागपूर यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या शिफारशीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) विभागीय आयुक्त, नागपूर यांनी यासंदर्भात त्यांना प्राप्त झालेल्या तक्रारींची प्राथमिक चौकशी उपप्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन व सहायक संचालक नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर विभाग यांची चौकशी समिती नेमून करवून घेतली.

• सदर प्राथमिक चौकशीत याप्रकरणी अनियमितता घडल्याचे दिसून आल्याने प्राथमिक चौकशी अहवाल जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना पाठवून विभागीय आयुक्तांनी-

अ) आर्थिक गुन्हयाशी संबंधीत शासकीय यंत्रणेकडून विस्तृत चौकशी

करण्यास, तसेच,

ब) अनियमिततेस जबाबदार विद्युत पर्यवेक्षक, लेखापाल आणि लिपिक यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यास,त्यांना निदेश दिले होते.

• सदर प्राथमिक चौकशी अहवाल शासनास पाठवून विभागीय आयुक्तांनी अनियमिततेस जबाबदार मुख्याधिकारी यांचेविरुद्ध विभागीय चौकशी शासन स्तरावर व्हावी, असे प्रस्तावित केले होते.

• तत्कालीन मुख्याधिकारी यांची अन्यत्र बदली करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी शासन स्तरावर सुरु करण्यात आली आहे.

• संबंधित विद्युत पर्यवेक्षक, लेखापाल व लिपिक यांचेविरुद्ध जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या स्तरावर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

• याप्रकरणी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गडचिरोली यांना विस्तृत चौकशी करण्याचे निदेश जिल्हाधिकारी, यांनी दिले असून त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यातील निष्कर्षाच्या आधारे याप्रकरणी फौजदारी गुन्हा नोंदवावा किंवा कसे, याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिंडोशी (मुंबई) येथील ४० एकराचा भूखंड विकासकाला देण्यात आल्याबाबत

**(५९) * १२६६०६ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोशी (मुंबई) येथे ४० एकरांच्या भूखंडावर प्रकल्पग्रस्तांसाठी मोठी वसाहत उभारण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका प्रशासनाने सन २००९ मध्ये घेऊन या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश तत्कालीन आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ४० एकराच्या भूखंडावरील ४१३१ झोपडीधारकांना उभ्या राहणाऱ्या इमारतीत नियमानुसार पीएपी ची घरे उपलब्ध होणार होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेच्या या योजनेविरोधात संबंधित विकासकाने मुंबई उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली असता तिथे महानगरपालिकेच्या विधी खात्याने महानगरपालिकेची बाजू न मांडल्यामुळे सदरचा भूखंड विकासकाला देण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक १४०/२००६ मध्ये मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने, मुंबईमधील तानसा मुख्य जलवाहिनीलगतच्या पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन दिंडोशी व मरोळ येथे करण्याबाबत कृती आराखडा तयार केला होता. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्रस्तावित कृती आराखडा राबविण्याचे आदेश दिले होते.
(२) व (३) सदर आदेशाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील दिंडोशी येथील अंदाजे ४० एकराच्या भूखंडावर अतिरिक्त क्षेत्रफळ निर्देशकाचा (एफ.एस.आय.) वापर करुन सदर भूखंडावर अस्तित्वात असलेल्या पी.ए.पी. चे त्याच ठिकाणी पुनर्वसन करुन उर्वरित सदनिकांमध्ये इतर पात्र प्रकल्पबाधीतांचे पुनर्वसन करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केले होते.

दिंडोशी येथील सदर भूखंडाचे मालक मे. एफ. ई. दिनशा ट्रस्ट यांनी सदर भूखंड दिनांक २२.०३.१९७४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केला होता. परंतु सदर भूखंडाच्या नुकसान भरपाईचा प्रश्न प्रलंबित असल्यामुळे सदर भूखंडाच्या मालकाने दिनांक १६.०९.२०११ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ नुसार खरेदी सूचना बजावली.

त्यामुळे सदर भूखंडाचे मालक मे. एफ. ई. दिनशा ट्रस्ट यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आरक्षण व्यपगत करण्यासाठी दाखल केलेल्या याचिका क्र.२००५/२०१४ मध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रतिज्ञापत्राद्वारे मा. न्यायालयासमोर सर्व बाबी मांडण्यात आल्या होत्या.

परंतु मा. न्यायालयाने सदर याचिकेतील दिनांक ०३.०५.२०१८ रोजीच्या निर्णयानुसार, सदर भूखंड मालकाने बजावलेल्या खरेदी सूचनेच्या अनुषंगाने एक वर्षाच्या कालावधीमध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेने भूसंपादनाची कार्यवाही सुरु न केल्याने आरक्षण व्यपगत करुन सदर भूखंड मालकाला एक वर्षात भूखंड रिक्त करुन परत देण्याचे अथवा सक्तीची भूसंपादन कार्यवाही करुन तो ताब्यात घेण्याचे आदेश दिले.

मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशास बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०९.२०१८ रोजीच्या आदेशानुसार महानगरपालिकेची याचिका दाखल करुन घेतली नाही.

सदर प्रकरणी सक्तीच्या भूसंपादनाचा एकमेव पर्याय उपलब्ध असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांना दिनांक २९.०९.२०१८ रोजी भूसंपादन प्रस्ताव सादर केला व त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांच्या दिनांक २२.१०.२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार सदर भूखंड संपादनासाठी अधिसूचित केली आहे.

सदर प्रकरणी भूसंपादनाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आणिक पांजरापोळ जोडरस्ता (मुंबई) प्रकल्पबाधित ९०४ झोपडीधारकांना वाशीनाका येथे रिकाम्या इमारतीमध्ये तात्पुरते सदनिका वाटप करण्याबाबत

**(६०) * १३०११६ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणुशक्तीनगर विधानसभा मतदार संघातील आणिक पांजरापोळ जोडरस्ता प्रकल्पबाधित ९०४ झोपडीधारकांना वाशीनाका येथे रिकाम्या इमारतीमध्ये तात्पुरते सदनिका वाटप करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने काही निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकल्पांतर्गत विवादग्रस्त झोपड्यांच्या पुनर्वसनासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र.९६७/२०१४ मध्ये दावा दाखल केलेल्या १० झोपडीधारकांचे पुनर्वसनाचे दावे खोटे असल्यामुळे सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. तरी ही स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी व झोपडी निष्कासनाचा दावा करणाऱ्या झोपडीधारकांची उपोषणे, मोर्चे इत्यादिद्वारे केलेल्या पुनर्वसनाच्या मागणीसंबंधी प्राधिकरणाच्या स्तरावर समिती गठित करुन प्राप्त झालेल्या माहितीची तपासणी करुन घेण्यात आली आहे. सदर समितीने आपला अहवाल प्राधिकरणाकडे सादर केला असून त्यामध्ये झोपडी निष्कासनाचा दावा असलेल्या झोपड्या प्रकल्पाने बाधित आणि निष्कासित केल्या नसल्याचे निष्कर्ष नोंदविले आहेत. सदर अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे. प्रश्न भाग-१ मध्ये नमूद केलेल्या निवेदनाद्वारे उक्त प्रकारच्या प्रकल्पग्रस्तांना तात्पुरत्या सदनिका वाटपाची मागणी पुढे आल्याने सदर मागणी मुंबई महानगर प्रदेश

विकास प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील तिरोडा नगरपरिषद क्षेत्रात IHSDP घरकुल योजना व रमाई घरकुल योजनेंतर्गत प्राप्त निधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६१) * १२७४०६ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील तिरोडा नगरपरिषद क्षेत्रात IHSDP घरकुल योजना व रमाई घरकुल योजना तसेच IHSDP मध्ये मुलभूत सुविधेसाठी प्राप्त निधीचा मुख्याधिकारी व पदाधिकारी यांनी गैरव्यवहार करून व नियमबाह्यरित्या निधीचा दुरुपयोग केल्याने तातडीने कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ३० जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन देवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे अंशत: खरे आहे.

याबाबत विधानसभा सदस्य, अचलपूर यांनी दि.२४.०९.२०१८ रोजी शासनास पत्र दिले आहे.

(२) मुख्याधिकारी, नगरपरिषद तिरोडा, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गोंदिया व मुख्य अभियंता, म्हाडा प्राधिकरण यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, तिरोडा नगरपरिषद क्षेत्रात IHSDP योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले असून, पूर्ण झालेल्या घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाचे TPIMA व BMTPC मार्फत निरिक्षण करण्यात आलेले असून, म्हाडाचे दक्षता पथक व संबंधित अधिकारी यांनी सदर प्रकल्पास भेटी दिल्या आहेत. दक्षता पथक व संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा प्रकल्प राबविण्यात आला आहे. IHSDP तसेच रमाई आवास योजनेत शासनाकडून प्राप्त निधीचा

कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दाभोळ खाडीच्या मुखावर गाळ साठल्याने मच्छीमारांना समुद्रामध्ये मासेमारी करणे धोक्याचे झाले असल्याबाबत

**(६२) * १३२२६५ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ खाडीच्या मुखावर गाळ साठल्याने मच्छीमारांना समुद्रामध्ये मासेमारी करण्यासाठी ये-जा करणे धोक्याचे झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओहोटीच्या वेळी पाण्याची पातळी २.३० मीटर होत असून तसेच एका बाजूला गोपाळगडाचे टोक आणि त्याला आदळून येणा-या लाटा त्यामुळे येथे वादळसदृश्य स्थिती पाहवयास मिळत असून शासनाने याकडे वेळीच लक्ष देण्याची आवश्यकता असून मुखावरील गाळ काढण्याची आवश्यकता असल्याने याबाबत मत्स्य विकास मंत्री, बंदर विकास मंत्री व मत्स्य आयुक्त यांना माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दाभोळ खाडी परिसर संघटनेने निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी वा पाहणी करून जलवाहतूक व मासेमारी सुरक्षितपणे व्हावी यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील मत्स्य बंदरातील गाळ काढण्याकरीता मत्स्य विभागाचे अधिकारी व मच्छिमारी संस्थाचे प्रतिनिधी यांनी जलसर्व्हेक्षण नकाशावर गाळ उपसणीचा नौकानयन मार्ग रेखांकीत करुन दिला असून त्याप्रमाणे मत्स्य बंदरातील गाळाचे परिमाण निश्चित करण्यात आले आहे. दाभोळ खाडीमधील एकूण ६,१७,४१४ घनमीटर गाळ काढणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मत्स्य बंदरातील गाळ उपसणी करण्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेणे व  निधी उपलब्ध करुन

देण्याबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या दिनांक २९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता शासनाने ऑनलाईन पद्धतीने सुरु केलेले 'आपले सरकार' पोर्टल अयशस्वी ठरल्याबाबत

**(६३) * १२७१९६ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता शासनाने ऑनलाईन पद्धतीने सुरु केलेले ‘आपले सरकार’ पोर्टल हे पूर्णपणे अयशस्वी ठरले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पोर्टलवर केलेल्या तक्रारीचे निवारण २१ कार्यालयीन दिवसात न झाल्यास नोडल अधिकारी वा उच्चपदस्थ अधिकारी यांना संपर्क करण्याची तरतूद असताना अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे ही निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाचे हे पोर्टल निष्क्रिय होण्याची नेमकी काय कारणे आहेत व सदरचे पोर्टल नियमितपणे सुरु करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(४) असल्यास, कधीपर्यंत शासन हे पोर्टल सुरळीतपणे सुरु करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
अशा आशयाची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) नाही.
“आपले सरकार-तक्रार निवारण” प्रणालीवर नोंदविलेल्या एकूण तक्रारींपैकी ९०% तक्रारींचे निवारण करण्यात आले असल्याचे व केवळ १०%

तक्रारी माहे ऑक्टोबर, २०१८ अखेरीस प्रणालीवर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुलींच्या अपहरणाच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र राज्य प्रथम असल्याबाबत

**(६४) * १२६८०३ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून गत पाच वर्षात मुंबईतून २६ हजार ७०८ मुली-महिला बेपत्ता झाल्या असून हे प्रमाण एकुण १५ पटीने वाढले आहे, त्यापैकी २ हजार २६४ मुलींचा अद्याप तपास लागला नसून मुंबईतील १८ वर्षाखालील बेपत्ता २२८ मुलींचाही अद्याप शोध लागला नसल्याचे, माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलांचा/मुलींचा वापर समाजकंटकांकडून अनैतिक कृत्यासाठी व भीक मागण्यासाठी केला जाण्याची शक्यता असल्याने या मुलांचा/मुलींचा तातडीने तपास करुन अपहरणकर्त्यांस

कडक शासन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच मानवी तस्करीबाबत मुंबई नंतर नागपूर मध्ये सर्वाधिक गुन्हे असून मानवी तस्करी नागपूर मार्गे केली जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून एनसीआरबीच्या २०१६ च्या अहवालानूसार राज्यात वर्षभरात मानवी तस्कीरीची ६३ प्रकरणे पुढे आली असून लहान मुलांविरोधातील ८९०८ गुन्हे समोर आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुलींच्या अपहरणाच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र राज्य प्रथम असल्याचेही राष्ट्रीय स्तरावरील आकडेवारीवरून स्पष्ट झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लोकसंख्येच्या प्रमाणात पोलीस दल अपुरे असल्यामुळे अशा घटना घडत असून पोलीस दल वाढविणेबाबत तसेच बेपत्ता मुले-मुली व महिलांचा लवकरात लवकर शोध लावण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातून अपहरण/ हरवलेल्या मुली व हरवलेल्या महिलांबाबत गत पाच वर्षातील कालावधीतील वर्षनिहाय सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| सन | १८ वर्षाखालील मुली | | १८ वर्षावरील महिला | |
|---|---|---|---|---|
| | अपहरण/हरवलेल्या | सापडलेल्या | हरवलेल्या | सापडलेल्या |
| २०१३ | ९२ | ७९ | ४०४१ | ३८२३ |
| २०१४ | १५०० | १४७५ | ४१७० | ३९४३ |
| २०१५ | ९२७ | ८७८ | ४३१५ | ४०३९ |
| २०१६ | ११६९ | १०९१ | ४५२७ | ४०९६ |
| २०१७ | १३६८ | १२३५ | ४५९९ | ३७८५ |
| एकूण | ५०५६ | ४७५८ | २१६५२ | १९६८६ |
| एकूण न | २९८ | | १९६६ | |

| | | |
|---|---|---|
| सापडलेल्या | | |

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ७५/२०१२ "बचपन बचाव आंदोलन" संदर्भात दिनांक १० मे, २०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या लहान मुलांचे बाबतीत उपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात येतो. त्यामुळे यामध्ये वाढ दिसून येत आहे.

(२) हरविलेल्या व्यक्तिंचा तपास करण्यासंदर्भात प्रमाणित कार्यपध्दती (SOP)तयार करण्यात आली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.७५/२०१२ (बचपन बचाव आंदोलन) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार १८ वर्षाखालील हरविलेल्या मुल/मुली संदर्भात अपहरणांचा गुन्हा दाखल करण्यात येतो.

हरविलेल्या मुलांच्या संदर्भात खालील वेबसाईट्स कार्यान्वित आहेत.

१) www.trackthemissingchild.gov.in

२) www.mumbaipolice.gov.in

३) www.shodh.gov.in

अपहरण/हरवलेल्या मुलींचा शोध घेण्यासाठी बृहन्मुंबई पोलींसाकडुन सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतात. यामुळे बहुतांश अपहरण/हरवलेल्या मुली सापडुन आलेल्या आहेत.

(३) एनसीआरबी व महारष्ट्र क्राईम २०१६ च्या अहवालानूसार राज्यात सन २०१६ मध्ये मानवी तस्करीचे एकूण १० गुन्हे नोंद झाले असून त्यामध्ये बळीतांची संख्या ५३ आहे. तसेच सन २०१६ मध्ये लहान मुलांवरील अत्याचाराबाबत एकूण ८५१८ गुन्हे दाखल असून बळीतांची संख्या ८९०८ आहे.

(४) राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग यांनी प्रकाशित केलेल्या सन २०१६ च्या अहवालानुसार राज्यात कलम ३६३ अंतर्गत मुलींचे अपहरणाचे एकूण ४४२२ गुन्हे दाखल आहेत.सन २०१६ मधील देशातील अपहरण व अपनयन चे नोंद गुन्हे पाहता लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याचा देशात १२ वा क्रमांक लागतो.

(५) बेपत्ता मुले-मुली व महिलांचा लवकरात लवकर शोध लावण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

• १८ वर्षा खालील हरविलेल्या मुलांच्या बाबतीत थेट अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात येतो.

• हरविलेल्या बालकांसंदर्भात आदर्श कार्यप्रणाली SOP सर्व पोलीस घटकांना वितरीत करण्यात आली आहे.

• हरविलेल्या मुले- मुलींची माहिती २४ तासाच्या आत मुख्य नियंत्रण कक्षामार्फत सर्व पोलीस ठाण्यांना बिनतारी संदेशाद्वारे प्रसारीत केली जाते.

• १०९८ ही टोल फ्री हेल्पलाईन कार्यान्वीत करण्यात आली आहे.

• मुंबईच्या धर्तीवर बाल भिक्षेकरी मुक्त करण्याकरीता २४ महानगरपालिका क्षेत्रामध्ये टास्कफोर्स गठीत करण्याचे प्रस्तावित आहे. पोलीस स्टेशनमध्ये ०१ पोलीस अधिकारी हा बाल कल्याण अधिकारी म्हणुन नेमण्यात आला आहे. ४६ पोलीस घटकांचे मुख्यालयात विशेष बाल पोलीस स्थापन करण्यात आलेली आहेत.

• सन जुलै २०१५ ते जुलै २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ५ आपरेशन मुस्कान अंतर्गत २०११२ हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंजवडी (पुणे) परिसरात उसतोड मजुरांच्या अल्पवयीन मुलींवर झालेला अत्याचार

**(६५) * १२६६७८ श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (पुणे) परिसरात उसतोड मजुरांच्या १२ वर्षीय २ अल्पवयीन मुलींवर दिनांक २० सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लैंगिक अत्याचार करण्यात आला असून त्यात एका मुलीचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेमुळे येथील परिसरात तीव्र संतापाची भावना पसरली असून या घटनेचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर घटनेचा खटला जलदगती न्यायालयात चालविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर घटना दिनांक १६/०९/२०१८ रोजी घडलेली आहे.

(२) व (३) सदर घटनेबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी येथे गु.र.नं ४९४/२०१८ भा.दं.वि. कलम ३६६(अ),३७६(ड) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ३,४,५ (ग) प्रमाणे दि. १९/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल असून दि.२०/०९/२०१८ रोजी सदर गुन्ह्यामध्ये ३७६ (ए बी), ३७६ (डी बी), ३७६,३७७ पोक्सो कलम ५(एम) ६, दि. २५/०९/२०१८ रोजी सह अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम सन २०१६ चे कलम ३(१)(डब्ल्यु)(ii) अन्वये आरोपीतांविरूध्द गुन्हा करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर गुन्ह्यातील तीन आरोपी क्र.१, ३ व ४ हे येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे न्यायालयीन कोठडीत आहेत व चौथा आरोपी क्र. २ विधी संघर्षग्रस्त बालक हा जामीनावर मुक्त आहे.दाखल गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

सदर खटला जलदगती न्यायालयात चालविण्याची विनंती मा.लोकप्रतिनिधी महोदयांनी केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील कॉलेज ऑफ फिजिशिअन ॲण्ड सर्जन (सीपीएस) महाविद्यालयातून पदव्यूत्तर पदविका उत्तीर्ण बनावट प्रमाणपत्रे सादर करणाऱ्या ५८ डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(६६) * १२६४५० श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर**

**(लोहा), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळच्या कॉलेज ऑफ फिजिशिअन ॲण्ड सर्जन (सीपीएस) महाविद्यालयातून पदव्यूत्तर पदविका उत्तीर्ण बनावट प्रमाणपत्रे सादर करुन बेकायदेशीररित्या नोंदणी करणाऱ्या ५८ डॉक्टर्स विरोधात महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने (एमएमसी) आग्रीपाडा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार देऊनही त्यांच्यावर अद्याप पोलीस अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केला नसल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरण सन २०१६ साली निदर्शनास आल्यानंतर या विद्यार्थ्यांनीची फसवणूक झाल्याचा दावा करून भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर याप्रकरणी दलाल म्हणून काम करणाऱ्या डॉ. स्नेहल ज्ञाति याला अटक करण्यात आले इतकेच नव्हेतर ज्ञाति याची एमएमसीने नोंदणी देखील रद्द केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७-२०१८ या वर्षामध्ये ५८ डॉक्टरांनी खोटी प्रमाणपत्रे दाखवून एमएमसीकडे नोंदणी केल्याचे निदर्शनास आले असून त्यामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ, नेत्रतज्ज्ञ, अस्थिरोगतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, शल्यविशारद आदि डॉक्टरांचा समावेश होता त्यांच्यावर माहे जुलै २०१८ मध्ये निलंबनाची कारवाई केली गेली तोपर्यंत हे बोगस डॉक्टर रुग्णांना सेवा देत होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ५८ डॉक्टरांबाबत एमएससीच्या सुनावणीत त्यांनी दलालांमार्फत खोटी प्रमाणपत्रे मिळविल्याचे संबंधीत अहवाल पोलीस ठाण्यात सादर करुनही अद्यापर्यंत दोषींविरुध्द कारवाई करण्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास करुन दोषींविरुध्द तात्काळ कारवाई करण्याबाबत तसेच सदरहू बोगस डॉक्टरांविरोधात गुन्हा दाखल करण्यास विलंब केल्याप्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यकक्षेतील आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रश्न हा ५८ विद्यार्थ्यांशी निगडीत नसून सन २०१६ मध्ये २० वैद्यकीय व्यावसायिकांनी अतिरिक्त अर्हतेच्या नोंदणीकरिता महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याबाबत निगडीत आहे. यापैकी डॉ. कुमार अनुराग जैसवाल यांनी दलाल म्हणून काम करणाऱ्या डॉ. स्नेहल न्याती यांची तक्रार भोईवाडा पोलीस ठाणे येथे नोंदविली होती. या प्रकरणाच्या अनुषंगाने त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक करण्यात आली होती. तसेच, परिषदेमार्फतही डॉ. न्याती यांची नोंदणी कायमस्वरुपी रद्द करण्यात आली आहे

(३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सन २०१७-१८ या वर्षामध्ये ५७ डॉक्टरांनी खोटी प्रमाणपत्रे दाखवून नोंदणी केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर डॉक्टरांची अतिरिक्त अर्हता नोंदणी रद्द करण्यात आली असून त्यापैकी ५० नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांचे नावे १ वर्षाकरिता व ७ नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांची नावे ५ वर्षाकरिता परिषदेच्या नोंदणी पुस्तकातून काढून टाकण्यात आली आहेत. तसेच सदर कालावधीकरिता त्यांना वैद्यकीय व्यवसाय करण्यास मज्जाव करण्याचे आदेश परिषदेकडून निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) सदर प्रकरणी पोलीसांकडून गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्लोब मिल पॅसेज शाळा, वरळी येथे वास्तव्य करणाऱ्या महानगरपालिका कामगारांना कायमस्वरूपी भुईभाडे आकारून राहण्यास मंजुरी देण्याबाबत

**(६७) * १२६४५७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी),**

**श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लोब मिल पॅसेज शाळा, वरळी येथे सन १९९५ च्या पूर्वीपासून वास्तव्य करणाऱ्या महानगरपालिका कामगारांना कायमस्वरूपी भुईभाडे आकारून राहण्यास मंजुरी देण्याबाबत व सेवानिवृत्तीचे सर्व लाभ देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अहवाल सादर करण्याचे निदेश दिनांक १२ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रधान सचिव, नगरविकास-२ यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, तसेच अहवालातील शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा स्वरुपाचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक १६.०४.२०१८ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक २६ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणाचा अहवाल शासनास अद्यापि अप्राप्त आहे.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या शाळांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(६८) * १२८६४१ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या

शाळेत विद्यार्थ्यांची हजेरी नोंद ठेवण्यासाठी बायोमॅट्रिक यंत्रणा बसवणे, मध्यवर्ती नियंत्रण कक्ष स्थापन करणे, सुरक्षेसाठी शाळांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तरतूद करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सुरु होऊनही शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी ४५ लाख रुपयांची तरतूद केली असूनही सदरहू कॅमेरे बसविण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली व शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • पुणे महानगरपालिकेच्या शाळात विद्यार्थ्यांची हजेरी नोंद ठेवण्यासाठी बायोमॅट्रीक यंत्रणा व मध्यवर्ती नियंत्रण कक्ष उभारण्याबाबत अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• तसेच पुणे महानगरपालिकेच्या २३० शाळांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी सन २०१८-१९ च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात रू.४१,४०,०००/- एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

• या कामाचे पूर्वगणनपत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे.

• पूर्वगणनपत्रक तयार झाल्यानंतर, निविदा प्रक्रीया राबवून पुढील कार्यवाही करण्याचे पुणे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे चेंबूर (ता.कुर्ला) न.भु.क्र. ६२ हा भुखंड एव्हरेस्ट को.ऑ.हौ.सो.लि. यांना दिल्याबाबत

**(६९) * १३०१४९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रदीप नाईक**

**(किनवट) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चेंबूर (ता.कुर्ला) न.भु.क्र. ६२ हा भुखंड एव्हरेस्ट को.ऑ.हौ.सो.लि. यांना महाराष्ट्र शासनाच्या २१९ युध्दोत्तर पुनर्वसन योजनेअंतर्गत मुक्त महसूलाने देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भुखंडावर असलेल्या पात्र झोपडीधारकांचे निष्कासन महानगरपालिकेने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भुखंडावरील पात्र झोपडीधारक श्री.अभिराम चानी व इतर २८ हे गत २० वर्षांपासून बेघर झालेले असून त्यांना महानगरपालिकेने अद्याप पी.ए.पी. सदनिका वितरीत केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) यांना सदर २९ पात्र झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ महानगरपालिकेस पाठवूनसुध्दा पी.ए.पी. वितरीत करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, पात्र झोपडीधारक हे अनेक वर्षापासून या विभागात रहात असल्याने त्यांना घाटकोपर व चेंबूर परिसरात पी.ए.पी. वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पुर्व उपनगरे यांच्या अहवालानुसार, प्रस्तुत जागेवर एकुण २५२ झोपडया होत्या. त्यापैकी संरक्षणास पात्र असलेल्या २९ झोपडयांपैकी ७ झोपडया व संरक्षणास पात्र नसलेल्या २२३ अतिक्रमणे अशी एकुण २३० अतिक्रमणे उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), चेंबूर व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित केली आहेत.

(३), (४), (५) व (६) श्री.अभिराम चानी व इतर २९ झोपडीधारकांपैकी २२ संरक्षणास पात्र झोपडयांचे निष्कासन करण्यात आले नव्हते. मात्र, ७ संरक्षण पात्र झोपडीधारकांचे निष्कासन करण्यात आले असून सद्य:स्थितीत २२ झोपडया अस्तित्वात आहेत. उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), चेंबूर कार्यालयाने पात्र २९ झोपडीधारकांची पात्रता निश्चित करुन परिशिष्ट-२ दि.१९.१२.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदर ७ संरक्षण पात्र

झोपडीधारकांचे पुनर्वसन विहित नियमांच्या अनुषंगाने करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील गैरकारभाराबाबत

**(७०) * १२६६२५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेतील गैरकारभारास तेथील नगररचनाकारासह अनेक प्रशासकीय अधिकारी जबाबदार असून त्यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी तेथील माजी नगरसेवकांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास तक्रार करुन चौकशीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे सुरु आहेत, तसेच दुषित पाणी, घाणीचे साम्राज्य, रुग्णालयांची दुरवस्था झाली असल्याची तक्रार मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी तसेच तेथील स्थानिक माजी नगरसेवकांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १३ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.

(३) • माजी नगरसेवक यांच्या दि. ११.०७.२०१८ च्या पत्रावर आयुक्त,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचा अहवाल दि. ३१.१०.२०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेला आहे.

• आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या अहवालानुसार महानगरपालिकेच्या नगररचना विभागा- संदर्भातील तक्रारीत तथ्य नसल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर नियमोचित कार्यवाही महानगरपालिकेमार्फत नियमित करण्यात येते.

• संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात वितरण वाहिनींद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. दुषीत पाण्याची तक्रार प्राप्त झाल्यास त्यावर तात्काळ उपाययोजना करण्यात येते. सद्यस्थितीत दुषीत पाण्याच्या तक्रारी नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

• महानगरपालिका क्षेत्रात तीन सत्रात कचरा संकलन व वाहतुकीचे काम करण्यात येते. रस्ते तसेच गटारी, सफाईचे काम नियमितपणे करण्यात येऊन शहरात कुठेही घाणीचे साम्राज्य पसरणार नाही याची दक्षता महानगरपालिकेमार्फत घेण्यात येते.

• कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेचे रूक्मिणीबाई रूग्णालय, कल्याण (प.) व शास्त्रीनगर सामान्य रूग्णालय, डोंबिवली (प.) ही प्रत्येकी १२० खाटांची दोन मोठी रूग्णालये, ४ लहान दवाखाने व १३ नागरी आरोग्य केंद्रे कार्यरत असून त्याद्वारे या क्षेत्रातील नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) शहारातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(७१) * १३२२६६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) शहरात रस्त्यांवर खड्डे असल्याने धुळीचे साम्राज्य पसरले आहे यामुळे स्थानिक लोक व येथे येणारे पर्यटक

धुलीकणांमुळे त्रस्त झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम खात्याकडून हा रस्ता नगरपालिकेला हस्तांतरीत केला गेला मात्र रस्ते दुरुस्तीसाठी नगरपालिकेकडे निधीच नसल्याने सदर रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपालिकेच्या हद्दीतील खेड-दापोली, मंडणगड-दापोली, दापोली-दाभोळ, दापोल-हर्णे, दापोली-बुरोंडी रस्ते नगरपालिकेने दुरुस्त केल्यानंतर सदर रस्त्यांची पुन्हा दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामांची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(५) असल्यास, रात्रीच्या वेळी रस्त्यावरील धुळ उडून वाहनांचा अपघात होण्याची शक्यता असल्याने निधी उपलब्ध करुन हे रस्ते दुरुस्त करण्याबाबत व कामाचा दर्जा सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) दापोली नगरपंचायतीच्या अहवालानूसार पावसाळ्यामध्ये सततच्या मुसळधार पावसामुळे नगरपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यावर खड्डे व त्यामुळे धुळीचे प्रमाण वाढले, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३), (४) व (५) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्ते दापोली नगरपंचातीकडे हस्तांतरीत झाल्यानंतर रस्त्यावर पडलेल्या खड्यांची दुरुस्ती वेळोवेळी नगरपंचायतीमार्फत करण्यात येते.

• सदर रस्त्यांच्या रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण तसेच रस्त्याच्या कडेला आर.सी.सी. गटारीचे बांधकाम करण्याच्या रु.५.९० कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रकांना सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

• सदर कामांकरीता निधी उपलब्धतेसंदर्भात प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

• निधी उपलब्धतेबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यास आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

• निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत तपासणी करुन वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील राजावाडी रुग्णालयाच्या आयसीयू विभागात एमबीबीएस ऐवजी बीएचएमएस, बीएमएस डॉक्टरांकडून उपचार करण्यात येत असल्याबाबत

**(७२) * १२६८३० श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विद्याविहार येथील राजावाडी रुग्णालयातील आयसीयुचे खाजगीकरण झाल्यानंतर आयसीयूमध्ये एमबीबीएस ऐवजी बिएमएस, बीएचएमस डॉक्टरांकडून उपचार सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आयसीयुमध्ये दाखल झालेल्या १९३ रुग्णांपैकी ६२ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले व दिनांक ६ ऑगस्ट, २०१८ पासून दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजीपर्यंत सुमारे १८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयाच्या आय.सी.यु. विभागाचे पूर्णपणे खाजगीकरण न करता

कंत्राटदाराकडून फक्त तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा घेतल्या जात आहेत व सदर विभागावर महानगरपालिका प्रशासनाचे पूर्ण नियंत्रण असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

सदर रुग्णालयातील अतिदक्षता व ट्रॉमा विभागामध्ये, ज्या एम.बी.बी.एस. पदवीधारकांनी पदव्युत्तर एम.डी./डी.एन.बी. वैद्यकशास्त्र/बधिरीकरण शास्त्र अभ्यासक्रम पूर्ण केला आहे अशा तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा बाह्यस्त्रोतीकरणाद्वारे दिनांक ०६.०८.२०१८ पासून २४ तास महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) सदर रुग्णालयात दिनांक ०६.०८.२०१८ ते २९.०८.२०१८ या कालावधीत ४१८ रुग्ण दाखल झाले असून, त्यापैकी ११५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

या कालावधीत ७४ रुण आय.सी.यु. मध्ये दाखल झाले असून, त्यापैकी २१ रुग्णांचा मृत्यू झाला आहे

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.

अतिदक्षता विभागात होणारे मृत्यू हे रुग्णांचे वय, त्यांना असलेले आजार व त्यांच्या आजाराची गंभीरता व रुग्णालयात दाखल करतेवेळेची स्थिती यावर अवलंबून असते.

तसेच, सदर रुग्णालयात दिनांक ०६.०८.२०१८ ते २९.०८.२०१८ या कालावधीत मृत्यू झालेल्या रुग्णांपैकी मृत्यूची कारणे साधारणत: अंतिम स्थितीतील कॅन्सर, हृदयविकाराचा तीव्र झटका, रेल्वे व रस्ता अपघात व इतर अत्यवस्थ स्थिती असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जी ब्लॉक मधील सी ५७ व ५८ हा भूखंड श्री नमन हॉटेल्स प्रा.लि.यांना लिजवर देण्यात आल्याबाबत

**(७३) * १२६४८३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जी ब्लॉक मधील सी ५७ व ५८ असे दोन भूखंड श्री. नमन हॉटेल्स प्रा.लि.यांना ४०९.२० कोटींचे मूल्य घेत लिजवर देण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतल्यानंतर, एमएमआरडीएशी नमन हॉटेल्स प्रा.लि.ने केलेल्या कराराचे पालन न केल्यामुळे एमएमआरडीएने नमन हॉटेल्स प्रा.लि.ला ३१.८२ कोटींची थकबाकी भरण्याबाबत वारंवार नोटीस पाठवूनही सदर हॉटेल व्यवस्थापनाने अद्यापी सदर थकबाकी भरली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ रोजी वा त्या सुमारास एमएमआरडीए प्रशासनाने भोगवटा प्रमाणपत्र देताना अतिरिक्त प्रमियम अदा केले जात नाही तोपर्यंत हॉटेल सुरु करण्यास मज्जाव केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास एमएमआरडीए प्रशासनाच्या नगर व क्षेत्र नियोजन विभागाचे तत्कालीन प्रमुख यांनी नमन हॉटेल्स प्रा.लि.ला पाच हप्त्यांची सूट देत कोणाचीही परवानगी न घेता नमन हॉटेलला स्वत:च्या अधिकारात विशेष सूट देऊन हॉटेल चालु करण्याचा परवाना देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, गत ५६ महिन्यात श्री नमन हॉटेल प्रा.लि.ने फक्त दोन हप्त्यांमध्ये ८ कोटी ७६ लाख भरले असून, त्यांच्याकडून व्याजासह ३१ कोटी ८२ लाख इतकं येणं बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नमन हॉटेल प्रा.लि.यांचेबरोबर एमएमआरडीएने सुरुवातीला व त्यानंतर वेळोवेळी केलेल्या करारातील अटी व शर्ती कोणत्या, त्याचे पालन न केल्याबद्दल सदर हॉटेल व्यवस्थापना विरोधात कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या वांद्रे-कुर्ला संकुलाच्या “जी”-ब्लॉकमधील सी-५७ व ५८ हा भूखंड दि. ९ जून, २००६ रोजी भाडेपट्टाकरार करुन वाटप केला आहे. या भाडेपट्टाकरारातील अटीप्रमाणे इमारतीच्या बांधकाम

पूर्णत्वाच्या ४ वर्षाचा निर्धारित कालावधीत बांधकाम पूर्ण न केल्यामूळे भाडेपट्टेदाराने अतिरिक्त अधिमूल्याचा भरणा करणे अपेक्षित आहे. मात्र हॉटेलसाठी लागणा-या अनेक ना हरकत दाखले मिळवणे शक्य व्हावे म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि. ११ ऑक्टोबर, २०११ रोजी सदर प्रिमियम अदा केले जात नाही तोपर्यंत हॉटेल सुरु न करण्याच्या अटीवर त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. त्यानंतर विषयांकित प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उर्वरीत अतिरीक्त अधिमूल्य ६ (त्रैमासिक) हफ्त्यामध्ये व्याजासह भरण्याबाबत वाटपग्रहीकडून हमिपत्र घेऊन हॉटेल चालू करण्यास दि. १५ फेब्रुवारी, २०१२ रोजी परवानगी दिली आहे. तरी देखील दि. १२ सप्टेंबर, २०१७ अखेरची (थकबाकी रु. ३२.१३ कोटी) रक्कम अप्राप्त असल्याने प्राधिकरणाने भाडेपट्टेदारास रिझम्पशनची नोटीस (भूखंड परत घेण्याची) दिली असून मेसर्स श्री. नमन हॉटेल्स प्रा.लि. यांनी सदर नोटीसी विरुध्द मा. मुंबई उच्च न्यायालयात क्रमांक WP(L) २८८०/२०१७ याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

-----------------

## वरळी येथील गणपतराव कदम मार्गाच्या १०० फुटी रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या उपकर प्राप्त चाळींतील रहिवाश्यांचे प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसन करण्याबाबत

**(७४) * १२६५६० श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराचा पुनर्रचित विकास आराखडा २०३४ मधील जी/ दक्षिण विभागातील आराखडा क्र.२० (आय सी-२०) मधील भू.क्र. १/१४९ हा भूखंड वरळी येथील गणपतराव कदम मार्गाच्या १०० फुटी रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या खाजगी उपकर प्राप्त चाळींतील रहिवाश्यांचे प्रकल्पबाधित म्हणून पुनर्वसन करण्यासाठी आरक्षित ठेवण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे

मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री-नगरविकास विभाग, आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे माहे जुलै, २०१८ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनात केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.सुनिल शिंदे यांचे दिनांक १६/०७/२०१८ चे निवेदन प्राप्त आहे.

(२) शासन नगर विकास विभाग कडील दि.८/०५/२०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे मंजूर करण्यात आलेल्या बृहन्मुंबई विकास आराखडा-२०३४ मध्ये भू.क्र. १/१४९, लोअर परेल डिव्हीजन या जमिनीवर बाग/ बगीचा (ROS १.५), यानगृह (DMS २.१), महापालिका दवाखाना/ आरोग्य केंद्र (RH १.१), प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन (RR २.१) अशी आरक्षणे मंजूर आहेत. प्राप्त निवेदनाचे अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अहवाल/ अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(३) अशी बाब नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.